मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २६१ ■ गुरुवार, ०४ जून २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# म्यानमारच्या राष्ट्रपतींची जेएनपीएला ऐतिहासिक भेट

## पायाभूत सुविधासह वाढवण बंदर प्रकल्पाची घेतली सविस्तर माहिती

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील :** म्यानमार प्रजासत्ताक संघाचे राष्ट्रपती महामहीम यू मिन आँग ह्लाइंग आणि त्यांच्या उच्चस्तरीय अधिकृत शिष्टमंडळाचे दोन दिवसीय मुंबई दौऱ्यासाठी आगमन झाले असून, दौऱ्याच्या पहिल्याच दिवशी त्यांनी भारतातील अग्रगण्य जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाला (JNPA) भेट दिली.

सागरी व्यापार, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि परस्पर सहकार्य वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या भेटीला अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. आज दुपारी राष्ट्रपतींचे आणि त्यांच्यासोबत आलेल्या शिष्टमंडळाचे जेएनपीएच्या प्रशासकीय इमारतीमध्ये आगमन झाले. याप्रसंगी जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटीचे अध्यक्ष गौरव दयाल यांनी राष्ट्रपतींचे अत्यंत उत्साहात स्वागत केले यावेळी जेएनपीएचे उपाध्यक्ष रविश कुमार सिंह, जेएनपीएचे अतिरिक्त मुख्य सचिव (परिवहन आणि क्रीडा), महाराष्ट्र शासन संजय सेठी, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य व्यवस्थापक आणि सचिव (प्रशासन) मनिषा जाधव, उपरक्षक बाळासाहेब पवार, मुख्य महाव्यवस्थापक (यातायात/वाहतुक) गिरिश थॉमस, मुख्य व्यवस्थापक (वित्त) राजश्री दपके आदि मान्यवर उपस्थित होते. यानंतर सर्व विभागांचे प्रमुख आणि सीआयएसएफचे (CISF) वरिष्ठ कमांडंट यांच्या उपस्थितीत दुसऱ्या मजल्यावरील परिषद सभागृहात मुख्य बैठकीला सुरुवात झाली. बैठकीच्या प्रारंभी जेएनपीएच्या अध्यक्षांनी राष्ट्रपतींसह त्यांच्या बरोबर आलेल्या उच्चस्तरीय अधिकृत शिष्टमंडळातील अधिकाऱ्यांचा परंपरेनुसार औपचारिक शाल व स्मृतीचिन्ह देऊन गौरव केला. जेएनपीएच्या अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत करत स्वागतपर भाषण केले.



या महत्त्वपूर्ण बैठकीदरम्यान म्यानमारच्या शिष्टमंडळासमोर जेएनपीएच्या कामकाजाची माहिती देणारा एक कॉर्पोरेट लघुपट दाखवण्यात आला. त्यानंतर भारताच्या सागरी क्षेत्रातील महत्त्वाकांक्षी अशा 'वाढवण बंदर प्रकल्पाची' (Vadhvan Port Project) माहिती देणाऱ्या विशेष चित्रपटाचे स्क्रिनिंग करण्यात आले. या सादरीकरणानंतर जेएनपीएच्या वतीने बंदराच्या जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा, परिचालन क्षमता, क्षमता विस्तार उपक्रम, धोरणात्मक प्रकल्प, शाश्वत विकासाचे उपाय आणि बंदराचा भविष्यातील दृष्टिकोन यांवर एक सविस्तर सादरीकरण (प्रेझेंटेशन) करण्यात आले. या माहितीपूर्ण सत्रांनंतर म्यानमारचे राष्ट्रपती महामहीम यू मिन आँग ह्लाइंग यांनी उपस्थितांना संबोधित केले. आपल्या संबोधनात त्यांनी जेएनपीएच्या अत्याधुनिक रचनेचे कौतुक करत दोन्ही देशांमधील सागरी संबंध अधिक दृढ करण्यावर भर दिला.


कार्यक्रमाच्या शेवटी जेएनपीएचे महाव्यवस्थापक (प्रशासन) आणि सचिव यांनी उपस्थित म्यानमारचे राष्ट्रपती, शिष्टमंडळ आणि सर्व अधिकाऱ्यांचे आभार मानले. बैठकीचा मुख्य टप्पा संपल्यानंतर प्रशासकीय इमारतीच्या दर्शनी भागात सर्व मान्यवरांचे एक सामूहिक छायाचित्र (ग्रुप फोटोग्राफ) घेण्यात आले.

त्यानंतर *म्यानमारच्या राष्ट्रपतींनी प्रत्यक्ष मैदानावर जात लँडिंग जेटी आणि व्ह्यूइंग पॉईंटला भेट देऊन बंदराच्या अथांग परिसराची आणि जहाजांच्या हाताळणीची प्रत्यक्ष पाहणी केली. भारत आणि म्यानमार यांच्यातील राजनैतिक आणि व्यापारी संबंधांना नवी गती देण्यासाठी हा दौरा मैलाचा दगड ठरेल.

# विद्यार्थ्यांच्या हातामध्ये मिळाली भविष्याची गुरुकिल्ली

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी :** गेल्या 25 दिवसांपासून आर्ट ऑफ लाइफ कोचिंग मध्ये पार पडत असलेल्या भविष्य समर ट्रेनिंग 2.0 मधील तीन ट्रेनिंग्स पूर्णपणे संपलेले आहे त्यापैकी एक ट्रेनिंग म्हणजे MPSC - UPSC फाउंडेशन ट्रेनिंग चे आज शेवटचे दिवस. या ट्रेनिंग मध्ये श्री अमित सवयी सर यांनी विद्यार्थ्यांना खूप महत्त्वाचे आणि मोलाचे मार्गदर्शन केले या स्पर्धा परीक्षांमध्ये कोणकोणत्या प्रकारचे अभ्यासक्रम, त्याविषयी सखोल माहिती तसेच अभ्यासक्रम कसा अभ्यास करायचा आणि सोबतच या परीक्षेमध्ये कसे उत्तीर्ण व्हायचे या परीक्षेमधील टप्पे किती



या परीक्षेचे महत्त्व आणि या परीक्षेला उत्तीर्ण केल्यानंतर सरकारी नोकरी मिळण्यापर्यंत असे प्रत्येक महत्त्वाच्या बाबी सरांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. MPSC - UPSC सारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये बहुतांश विद्यार्थी उत्तीर्ण न होण्याचं मागचं कारण हेच की विद्यार्थ्यांना लहानपणापासून त्या गोष्टी किंवा त्या स्पर्धा परीक्षा विषयी मार्गदर्शन न मिळणे. अशा स्पर्धा परीक्षा यांचा आपल्या जीवनामध्ये काय प्रभाव होऊ शकतो याची फायदे आणि समाजाविषयी बांधिलकी समाजातील प्रत्येक व्यक्तीला कसं जगता यावं याविषयी संपूर्ण माहिती आणि वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांचे खूप मोलाने आणि आत्मीयतेने सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या ट्रेनिंगच्या आजच्या शेवटच्या टप्प्यात श्री अमित सवयी सरांनी विद्यार्थ्यांना एक मार्गदर्शन म्हणून त्यांच्या हातामध्ये गुरुकिल्ली सोपवली. त्या गुरुकिल्ली मध्ये MPSC - UPSC ही स्पर्धा परीक्षा काय असते, या परीक्षेचे किती टप्पे असतात, या परीक्षांमधून कोणकोणत्या सरकारी नोकरी आपल्याला मिळू शकतात, या स्पर्धा परीक्षांचे वैयक्तिक, सामाजिक तसेच आर्थिक लाभ अशा बहुमूल्य गोष्टींचा समावेश या गुरुकिल्ली मध्ये सरांनी केलेला आहे. आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग लाखनी हे खरंच या विद्यार्थ्यांसाठी एक वरदानच स्थान ठरलेला आहे कारण ज्या उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये बाकीचे विद्यार्थी इतरत्र भटकत असतात याच उन्हाळ्याच्या सुट्ट्या आणि कडकडत्या उन्हाची चटके सहन करून हे विद्यार्थी त्यांच्या भविष्यासाठी खूप प्रामाणिक आहेत हे सिद्ध केले. अशा विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा शाब्दिक आभार मानून आणि सोबतच या समर ट्रेनिंगचा ०९ जून 2026 रोजी समारोपीय कार्यक्रम असल्याचे आर्ट्स ऑफ लाईक कोचिंग चे संचालक श्री निहाल वालदे सर यांनी सांगितले. शेवटची आणि अति महत्त्वाची जी आजच्या युगाला जोडणारी अशी ट्रेनिंग म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि आयोटी रोबोटिक्स ट्रेनिंग. 4 जून 2026 पासून या ट्रेनिंग ची सुरुवात होणार आहे पुढील वाटचालीस प्रत्येक विद्यार्थ्यांना आणि प्रत्येक प्रशिक्षकांना शुभेच्छा.

# उद्योगपती कान्हाशेठ ठाकूर यांचे निधन

**दैनिक युवक आधार**



**पनवेल(प्रतिनिधी) :** माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सख्खे चुलत बंधू आणि आमदार प्रशांत ठाकूर व परेशशेठ ठाकूर यांचे काका, प्रसिद्ध उद्योगपती कान्हाशेठ ठाकूर यांचे आज (दि.०३ जून) रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथे जन्माला आलेल्या कान्हाशेठ ठाकूर यांनी प्रतिकूल परिस्थितीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योगधंद्यात जम बसविला. एकेकाळी मचव्यातून रेती व्यवसाय करीत असलेले कान्हाशेठ ठाकूर आज रेल्वेमधील प्रसिद्ध ठेकेदार म्हणून गणले गेले. न्हावा ग्रामपंचायतीमध्ये सदस्य म्हणून निवडून आल्यानंतर आपल्या निर्भिड स्वभावाप्रमाणे त्यांनी अनेक विकासकामे मार्गी लावली. उद्योगधंद्यात नावारुपाला आल्यानंतर अनेक गरजूंना त्यांनी उदारहस्ते मदत केली. देवभोळे असल्यामुळे अनेक धार्मिक कार्यांना, मंदिरांनाही त्यांनी मोठ्या प्रमाणात मदत केली. उद्योगधंद्यात कार्यरत असताना आपल्या न्हावेखाडी गावाकडे त्यांचे नेहमीच लक्ष असायचे.उद्योगव्यवसायात त्यांची मुले, सागरशेठ ठाकूर, सम्राट ठाकूर, रोशन ठाकूर, जावई अल्केश बैकर त्यांचा वारसा चालवत आहेत. कान्हाशेठ यांच्या पश्चात धर्मपत्नी देवकाबाई (बाय) ठाकूर, तीन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे आणि मोठा ठाकूर परिवार आहे. कान्हाशेठ ठाकूर यांच्या पार्थिवावर न्हावेखाडी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, पनवेलचे महापौर नितीन पाटील, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, कृष्णाशेठ ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधीपक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, प्रवीण पाटील, मधु पाटील, नरेंद्र ठाकूर, वासुदेव पाटील, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, उद्योगपती विजय जाधव कडू, वसंतशेठ पाटील, भाऊशेठ पाटील, सुनिल म्हसकर, चेतन उर्फ भायाशेठ म्हात्रे, संजय पाटील, हरिश्चंद्र पाटील यांच्यासह नातेवाईक आप्तेष्ट, मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील मान्यवर, ग्रामस्थ उपस्थित होते.




# "रस्त्याच्या कडेला मृत्यूचे खांब; महावितरण अपघाताची वाट पाहतेय का?"



## भरवस–लासलगाव रस्त्यावर धोकादायक वीज खांबांमुळे ग्रामस्थ संतप्त; तात्काळ कारवाईची मागणी

**"भरवस–लासलगाव रस्त्यावर उभारण्यात आलेले हे वीज खांब पाहून आश्चर्य वाटते. रस्त्याच्या अगदी कडेला खांब उभारणे म्हणजे अपघाताला खुले आमंत्रण देण्यासारखे आहे. उद्या एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव गेला तर त्याची जबाबदारी कोण घेणार? महावितरणने अपघाताची वाट न पाहता तात्काळ हे खांब सुरक्षित ठिकाणी हलवावेत, अन्यथा नागरिकांना रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही."**

**सचिन कांगणे गोंदेगा**

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी :** भरवस–लासलगाव मार्गावर महावितरणने उभारलेले वीज खांब सध्या नागरिकांच्या चिंतेचा विषय बनले आहेत. रस्त्याच्या अगदी कडेला उभे करण्यात आलेले हे खांब अपघातांना निमंत्रण देत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. वाहनांची मोठी वर्दळ असलेल्या या मार्गावर सुरक्षेचा कोणताही विचार न करता खांब उभारण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, एखाद्या वाहनाचा थोडासा ताबा सुटला किंवा चालकाचा अंदाज चुकला तरी वाहन थेट वीज खांबावर आदळू शकते. विशेषतः रात्रीच्या वेळी, धुक्यात आणि पावसाळ्यात हा धोका अधिक वाढणार आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जीविताशी खेळ सुरू असल्याची भावना व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांचा सवाल आहे की, रस्त्यालगत एवढ्या धोकादायक पद्धतीने खांब उभारण्यास मंजुरी कोणी दिली? सुरक्षेच्या निकषांची तपासणी करण्यात आली होती का? की एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार आहे?

नागरिकांनी महावितरण आणि संबंधित प्रशासनाकडे तातडीने लक्ष देऊन हे खांब सुरक्षित अंतरावर हलवण्याची मागणी केली आहे. अन्यथा भविष्यात घडणाऱ्या कोणत्याही अपघाताची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागावर राहील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# स्वच्छतेत निफाड बसस्थानकाची राज्यभर दखल; नाशिक प्रदेशात तिसरा क्रमांक, ५ लाखांचे पारितोषिक

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान २०२५-२६' अंतर्गत निफाड बसस्थानकाने उल्लेखनीय कामगिरी करत नाशिक प्रदेशातील 'ब' वर्ग बसस्थानकांच्या स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल निफाड बसस्थानकाला ५ लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले असून, आगारातील अधिकारी, कर्मचारी आणि प्रवाशांकडून या यशाबद्दल समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

स्वच्छता, परिसराचे सुशोभीकरण, प्रवाशांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सुविधा, शिस्तबद्ध व्यवस्थापन तसेच बसस्थानक परिसरातील स्वच्छ आणि आकर्षक वातावरण या विविध निकषांवर निफाड बसस्थानकाने उत्कृष्ट कामगिरी केली. त्यामुळे नाशिक प्रदेशातील अनेक बसस्थानकांमध्ये निफाड बसस्थानकाने आपला वेगळा ठसा उमटविला आहे.

या यशामागे वाहतूक नियंत्रक गवळी आणि पीठे यांचे विशेष योगदान राहिले. बसस्थानक परिसर स्वच्छ व नीटनेटका ठेवण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच स्वच्छता अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देत विविध उपक्रम राबविण्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला.

याशिवाय प्रादेशिक व्यवस्थापक विजयजी गिते, विभाग नियंत्रक सचिनजी क्षीरसागर आणि विभागीय वाहतूक अधिकारी किरण भोसले यांचे वेळोवेळी लाभलेले मार्गदर्शन आणि पाठबळही या यशामध्ये महत्त्वपूर्ण ठरले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनांनुसार बसस्थानक परिसरात स्वच्छता, सुशोभीकरण आणि प्रवासी सुविधांमध्ये सुधारणा करण्यात आली. त्यामुळे बसस्थानकाच्या एकूण दर्जामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.





## लालपरीचा ७८ वा वर्धापन दिनही उत्साहात साजरा

विशेष म्हणजे, हे यश केवळ काही अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांचे नसून आगारातील सर्व अधिकारी, कर्मचारी, चालक, वाहक आणि वाहतूक नियंत्रक यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित असल्याचे यावेळी सांगण्यात आले. स्वच्छता अभियानात सर्वांनी स्वयंप्रेरणेने सहभाग घेत बसस्थानक परिसर स्वच्छ आणि आकर्षक बनविण्यासाठी मेहनत घेतली. त्यामुळेच निफाड बसस्थानकाला नाशिक प्रदेशात मानाचे स्थान मिळविता आले.

दरम्यान, या आनंददायी यशासोबतच आज निफाड बसस्थानकावर महाराष्ट्राच्या जनतेची जीवनवाहिनी असलेल्या 'लालपरी'चा ७८ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. सकाळपासूनच बसस्थानक परिसरात उत्सवी वातावरण पाहायला मिळाले.

वर्धापन दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते श्रीफळ वाढवून लालपरीचे विधिवत पूजन करण्यात आले. एसटी सेवेमुळे लाखो प्रवाशांचे जीवन सुलभ झाले असून, ग्रामीण भागाला शहरांशी जोडणाऱ्या या सेवेला अभिवादन करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर एका महिला प्रवाशाच्या हस्ते केक कापून लालपरीचा वाढदिवस साजरा करण्यात आला. या अनोख्या उपक्रमामुळे प्रवाशांनाही कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमाला आगार व्यवस्थापक सविता काळे, आगारातील चालक, वाहक, वाहतूक नियंत्रक, कर्मचारी तसेच प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी लालपरीच्या दीर्घ आणि यशस्वी सेवेला शुभेच्छा देत भविष्यातही एसटी सेवा अधिक सक्षम आणि प्रवाशाभिमुख होण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.

स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियानातील उल्लेखनीय यश आणि लालपरीचा ७८ वा वर्धापन दिन या दुहेरी आनंदामुळे निफाड बसस्थानक परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. निफाड बसस्थानकाने स्वच्छता, शिस्तबद्धता आणि उत्कृष्ट प्रवासी सेवेमध्ये निर्माण केलेला आदर्श भविष्यात इतर बसस्थानकांसाठीही प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# निर्भय युवा ग्रामीण पत्रकार संघाचा द्वितीय वर्धापन दिन पाच जूनला माहुर गड मध्ये होणार

**दैनिक युवक आधार**
**माहूर ईसा सय्यद प्रतिनिधी** : समाजातील प्रत्येक घटकांच्या न्याय व हक्कासाठी सदैव तत्पर असलेल्या ,"निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ" (भारत) चा द्वितीय वर्धापन दिन व पत्रकारांचा सन्मान व पुरस्कार सोहळा दि.5 जून 2026 रोजी "जगदंबा सभागृह बस स्टँड रोड, माहूरगड" या ठिकाणी सकाळी 11 वाजता संपन्न होत आहे तरी आपण सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी. या कार्यक्रमास निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय श्री गणेश कचकलवार व तसेच दभप सद्गुरू साईनाथ महाराज वसमतकर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे .

तरी आपण सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.



# एरंडोल नगरपालिका पोटनिवडणुकीत प्रभाग क्रमांक ९-ब मधून डॉ. देवयानी पाटील यांची बिनविरोध निवड निश्चित

**विशेष प्रतिनिधी स्वप्निल पाटील** : एरंडोल नगरपालिका पोटनिवडणुकीत प्रभाग क्रमांक ९-ब मधून डॉ. देवयानी पाटील यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम मुदतीनंतर इतर कोणत्याही उमेदवाराचा अर्ज शिल्लक नसल्याने डॉ. देवयानी पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा करण्यात आली.नगरपालिका सभागृहात दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज माघारीची प्रक्रिया पार पडली चार उमेदवारांनी माघार घेतल्यानंतर डॉक्टर. देवयानी लीलाधर पाटील या एकमेव उमेदवार उरल्याने प्रभाग क्रमांक 9 ब मध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निकालाने बिनविरोध घोषित करण्यात आले.डॉ.देवयानी पाटील ह्या माजी नगरसेविका जिजाबाई वसंत पाटील यांच्या नातबाई आहेत. जिजाबाई पाटील यांच्या निधनानंतर या प्रभागात ही जागा रिक्त झाली होती . त्यामुळे परिसरात भावनिक व राजकीय दृष्टिकोनातून पाहिले गेले .डॉ. देवयानी पाटील यांच्या बिनविरोध निवडीमुळे



त्यांच्या समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

प्रभागाच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्या प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, या निवडीमुळे स्थानिक राजकीय वर्तुळातही चर्चा रंगली असून प्रभागाच्या विकासाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# क्रीडा सह्याद्री निफाड अयोजित'स्वराज्यरक्षक धर्मवीर राजे संभाजी महाराज' जयंतीनिमित्त जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न!

**दैनिक युवक आधार**
**विलास गायकवाड** -क्रीडा प्रबोधनी व क्रीडा सह्याद्री निफाड यांच्या वतीने स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेली 'जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा' अत्यंत रोमांचक आणि उत्साही वातावरणात संपन्न झाली. जिल्ह्यातील तब्बल २४ मातब्बर संघांनी या स्पर्धेत आपला दमदार सहभाग नोंदवला होता. निफाडकर क्रीडाप्रेमींच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने मैदानावर अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला.

या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक ब्रह्म आडगाव,द्वितीय क्रमांक ब्रह्मा आडगाव बी, तृतीय क्रमांक रुद्र सिन्नर चतुर्थ क्रमांक क्रीडा प्रबोधिनी निफाड यांनी मिळवल्याबद्दल त्यांचे निफाड शहरात सर्वत्र अभिनंदन होत आहे

**मान्यवरांच्या उपस्थितीत दिमाखदार उद्घाटन**

स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी शिवसेना निफाड *तालुकाप्रमुख तथा उपनगराध्यक्ष अनिल अण्णा कुंदे * प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी खेळाडूंना आणि उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी "खेळाडूंनी छत्रपती संभाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास डोळ्यांसमोर ठेवून मैदानावर शौर्य आणि खिलाडूवृत्ती दाखवावी," असे मोलाचे मार्गदर्शन केले.



> **खेळाडूंच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि ग्रामीण भागातील क्रीडा कौशल्याला व्यासपीठ मिळवून देण्यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन करणे गरजेचे आहे. राजे संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त या ऊर्जेला एक वेगळीच दिशा मिळाली."**
>
> **— आयोजक समिती**

**प्रमुख सहयोग आणि मार्गदर्शन**

या भव्य क्रीडा महोत्सवासाठी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस संजय गाजरे, ज्येष्ठ मार्गदर्शक नंदलालजी काका चोरडिया, आणि क्रीडाप्रेमी तसेच कुंदन हॉटेलचे संचालक स्वप्निल दादा गोळे व भीमराव काळे, विलास निरभवणे, राजेंद्र सोमवंशी, यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्यांच्या खंबीर पाठिंब्यामुळेच ही स्पर्धा भव्य स्वरूपात साकारता आली.

**युवा कार्यकर्त्यांचे अचूक नियोजन आणि अथक परिश्रम**

स्पर्धेचे मुख्य आयोजक दत्तू रायते आणि विलास गायकवाडव, चेतन कुंदे यांच्या नेतृत्वाखाली स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. स्पर्धा शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी अमोल अहिरे, आदित्य सूर्यवंशी, आणि साजिद शेख,अजय मेधने,शिवकुमार बोरगुडे,संकेत खताळेअमोल देवकर,संकेत बोरगुडे,मितेश जाधवनिलेश पगारे,सोनू मंडलिक,विकास मुरकुटे,पियुष यादव,सोनू महतो,अनमोल यादव,सदा कांदळकरसंस्कार वघुले,अमित निकम,साहिल केदारे,ऋषीकेश गडाख या युवा कार्यकर्त्यांनी व क्रीडाप्रेमींनी अहोरात्र कष्ट घेतले.

**निफाडकरांचे आशीर्वाद आणि आभार**

निफाड नगरीत या स्पर्धा अत्यंत चुरशीच्या आणि ऐतिहासिक पद्धतीने पार पडल्या. या यशस्वी आयोजनामागे निफाड तालुक्यातील समस्त ग्रामस्थ, नगरसेवक, उपनगराध्यक्ष आणि क्रीडा रसिकांचे मोलाचे सहकार्य लाभले. हे सहकार्य आम्हा आयोजकांसाठी एका आशीर्वादासारखे आहे, अशा भावना क्रीडा प्रबोधनीच्या वतीने व्यक्त करण्यात आल्या.शेवटी, क्रीडा प्रबोधनी निफाड परिवाराच्या वतीने या स्पर्धेत सहभागी झालेले सर्व संघ, क्रीडाप्रेमी, ग्रामस्थ आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार मानण्यात आले."नेत्रदीपक नियोजन आणि खेळाडूंचा उत्साह! क्रीडा प्रबोधनी निफाडचे अध्यक्ष दत्तू रायते आणि विलास गायकवाड यांच्या अचूक नियोजनाच्या जोरावर या स्पर्धेने यशाचे एक नवे शिखर गाठले." सूत्रसंचालन विलास गायकवाड यांनी केले तर आभार दत्तू रायते यांनी आभार मानले.

# शाळेने केला वाहतुकीचा रस्ता गिळंकृत; वाहतूक विभागाकडून कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार -**
**अमोल कांबळे ( ऐरोली प्रतिनिधी ) :** ऐरोली सेक्टर १४ येथील एका सुप्रसिद्ध शाळेने संपूर्ण रस्ता गिळंकृत केला आहे. या शाळेचे बस चालक जणू काय स्वतःच्या मालकीचा रस्ता असल्यासारखे वागतात. आत मध्ये पार्किंग असताना सुद्धा बेकायदेशीरपणे संपूर्ण रस्त्यावर दुतर्फा स्कुल बस लावल्या जातात. त्यामुळे इतर सोसायटी मधील नागरिकांना तसेच पालकांना येजा करण्यासाठी नाहक त्रास सहन करावा लागतो. तसेच कित्येक वाहन चालक रस्ता देण्याकरिता हॉर्न वाजवतात परंतु यांचे चालक कोणताही प्रतिसाद देत नाहीत. रस्ता अडवून ठेवतात. काही महिन्यांपूर्वीच येथे मोठा अपघात झाला होता त्यामध्ये २ अल्पवयीन मुलांचा मृत्यू झाला होता. शाळेच्या या अशा उद्धट वाहन चालकांमुळे त्या अपघाताची पुनरावृत्ती होण्याची दाट शक्यता आहे.



दुसऱ्यांना शिस्त लावणाऱ्यां शाळेने सर्वप्रथम आपल्या कर्मचाऱ्यांना योग्य ठिकाणी वाहन पार्क करण्याची शिस्त लावावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. याबाबत वाहतूक विभागाने योग्य ती कारवाई करणे अपेक्षित आहे.

# अन्वी येथील ३० वर्षीय तरुणाचा आकस्मिक मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगरयोगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील अन्वी येथील ३० वर्षीय तरुणाचा अज्ञात कारणाने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी उघडकीस आली आहे. या प्रकरणी सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मयत आबा पांडुरंग काळे (वय ३०) हे १ जून रोजी दुपारी सव्वातीन वाजेच्या सुमारास बेशुद्ध अवस्थेत आढळले. नातेवाईकांनी त्यांना तातडीने उपचारासाठी सिल्लोड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले; मात्र, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. या घटनेची सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल सचिन काळे करत आहेत.



# पिकअपची ट्रेलरला धडक, एकाचा मृत्यू, चौघेजण जखमी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** पिकअपने पुढे जाणाऱ्या ट्रेलरला धडक दिल्याने झालेल्या अपघातात चालक जयपाल खोपटकर (राहणार दिघी श्रीवर्धन) याचा मृत्यू झाला तर चौघेजण जखमी झाले. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात दोन जून रोजी करण्यात आली दोन जून रोजी मध्यरात्री 12 च्या सुमारास डोंबाला कॉलेज, पनवेल समोरील ब्रिजवर पळस्पे ते जेएनपीटी कडे जाणाऱ्या लेनवर पिकअप क्रमांक एमएच ०६ बी डब्ल्यू ६१०१ वरील चालक जयपाल हाश्या खोपटकर यांनी पिकअप भरधाव वेगाने चालवला आणि पुढे जाणाऱ्या ट्रेलर क्रमांक एम एच 16 सीसी 2979 याला पाठीमागून जोरात धडक दिली. या झालेल्या अपघातात जयपाल खोपटकर गंभीर जखमी झाला आणि त्याचा मृत्यू झाला तर पिकअप मधील कृष्णा लक्ष्मण चिकाटी, काशिनाथ भानगोजी, कमलाकर लक्ष्मण चिकाटी, अविनाश रामदास गुंड हे चौघेजण गंभीर जखमी झाले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.




# डोंबिवलीचे डॉ .दिगंबर तायडे 'भारत विभूषण पुरस्कार 2026' ने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (दत्ता खंदारे ) :** पंजाब सरकारचा प्रतिष्ठेचा 'भारत विभूषण पुरस्कार 2026' डोंबिवलीचे डॉ.दिगंबर सीताराम तायडे यांना प्रदान करण्यात आला.चंदीगड येथे पंजाब विधानसभा अध्यक्ष सरदार कुलतारसिंग संधवान यांच्या हस्ते त्यांना 'शाश्वत शहरी विकासातील उत्कृष्टता' या क्षेत्रासाठी सन्मानित करण्यात आले.

चंदीगडच्या पंजाब विधानसभेच्या प्रादेशिक सभागृहात हा सोहळा पार पडला. इन्स्टिट्यूट फॉर सोशल रिफॉर्म्स अँड हायर एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्ट ISRHE ने कार्यक्रमाचे आयोजन केले होते.




सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या डोंगर कठोरा गावातून आलेले डॉ. तायडे सध्या डोंबिवलीत स्थायिक आहेत. सेवानिवृत्तीनंतर गायन व समाजसेवेत त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे

# नोकरीसोबतच सामाजिक भान जपल्याने सन्मान सोहळ्याला शेकडोंची गर्दी जमली - आ. गजानन लवटे

## दऱ्यापूरात प्रा. कमलकिशोर खेतान यांचा सेवानिवृत्तीनिमित्त भव्य स्नेहमिलन व सत्कार सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : कोणत्याही क्षेत्रात कार्य करताना आपल्या कर्तव्याबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणे आवश्यक असते.अशा व्यक्तींची ओळख समाजाच्या मनात कायमस्वरूपी कोरली जाते. प्रा. कमलकिशोर कालूरामजी खेतान यांनी ३६ वर्षांच्या शैक्षणिक सेवेसोबतच सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्यामुळे त्यांच्या सेवानिवृत्ती सन्मान सोहळ्यास शेकडो नागरिकांनी उपस्थिती लावली, असे गौरवोद्गार दऱ्यापूरचे आमदार गजाननराव लवटे यांनी काढले. दऱ्यापूर येथील माहेश्वरी भवन येथे आयोजित प्रा. कमलकिशोर खेतान यांच्या सेवानिवृत्ती सत्कार व स्नेहमिलन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, शिक्षक आमदार ॲड. किरण सरनाईक, माजी मंत्री श्रीकांत देशपांडे, नगराध्यक्षा मंदाकिनी भारसाकळे, भाजपा शिक्षक सेलच्या प्रदेशाध्यक्ष संगीता शिंदे-बोंडे, शिक्षक भारती संघटनेचे विभागीय अध्यक्ष सुरेशराव देवकर, सहकार नेते सुधाकर पाटील भारसाकळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. खेतान यांनी उ. ना. लोणकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या व्यावसायिक अभ्यासक्रम विभागात तब्बल ३६ वर्षे प्राध्यापक म्हणून सेवा बजावली. शिक्षकी पेशासोबतच




**सेवानिवृत्ती सत्कार सोहळ्यात प्रा. कमलकिशोर खेतान यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करताना. यावेळी आमदार गजानन लवटे, खासदार बळवंत वानखडे, ॲड. किरण सरनाईक आदी उपस्थित होते.**

त्यांनी सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग नोंदवत अनेक उपक्रम राबविले. त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे मित्रपरिवार, नातेवाईक, माजी विद्यार्थी, सहकारी शिक्षक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदी-विक्री संघ, मुख्याध्यापक संघ, खासदार व आमदार कार्यालय, उ. ना. लोणकर कनिष्ठ महाविद्यालय, कोकिळाबाई गावंडे विद्यालय बाभळी, अकोला अर्बन बँक, प्रबोधन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तसेच विविध सामाजिक संस्था व मित्रपरिवाराच्या वतीने प्रा. खेतान यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्यांच्या पत्नी उर्मिला खेतान, मुलगा मयूर खेतान, सून रमा खेतान, मुलगी पुनम खेतान, मोठे बंधू ओमप्रकाश खेतान, सुनंदा खेतान, डॉ. सूरज खेतान यांच्यासह संपूर्ण खेतान परिवार उपस्थित होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनंजय चौधरी यांनी केले. संचालन व आभार प्रदर्शन प्रा. धनंजय देशमुख यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी खेतान परिवार व मित्रपरिवाराने विशेष परिश्रम घेतले.

**"प्रा. खेतान सर यांचे कार्य कौतुकास्पद"**

प्रा. खेतान सर आणि मी वर्गमित्र असून शालेय जीवनापासून आमची मैत्री आहे. त्यांनी शिक्षकी पेशात केलेले कार्य कौतुकास्पद असून विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा.

बळवंत वानखडे, खासदार, अमरावती

**"सेवानिवृत्ती कार्यक्रमाने भारावून गेलो"**

शिक्षक हा समाजाचा कणा असतो. प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या शिक्षकाचा समाज नक्कीच गौरव करतो. एवढा भव्य सत्कार सोहळा पाहून मी भारावून गेलो.

ॲड. किरण सरनाईक, शिक्षक आमदार

**"कार्यक्रमातील उपस्थितीच सरांचे कार्य सांगून जाते"**

प्रा. खेतान यांनी शिक्षकी पेशासोबत समाजकार्यातही मोठे योगदान दिले आहे. त्यांनी घडविलेले विद्यार्थी आणि समाजातील त्यांचे कार्य यामुळेच आज एवढा भव्य कार्यक्रम पार पडला.

सौ. संगीता शिंदे-बोंडे, प्रदेशाध्यक्ष, भाजपा शिक्षक सेल

**"प्रामाणिक कार्याची पावती मिळतेच"**

कोणत्याही क्षेत्रात प्रामाणिकपणे काम केल्यास समाज त्याची दखल घेतो. प्रा. खेतान यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय असून हा भव्य सत्कार त्यांच्या कार्याचीच पावती आहे.

- सुधाकर पाटील भारसाकळे, संचालक, जिल्हा मध्यवर्ती बँक, अमरावती

## कोकणात घराणेशाहीचा धबधबा!

# खासदार, आमदार, मंत्रीपद एकाच घरात;रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये राजकीय वारसा मजबूत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :दिपक कोळवणकर** : घराणेशाही हा मुद्दा महाराष्ट्राच्या राजकारणात नवीन नाही. मात्र आता कोकणही त्याला अपवाद राहिलेला नसल्याचे चित्र अधिक स्पष्टपणे दिसू लागले आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा घराणेशाहीचा मुद्दा चर्चेत आला असून, विशेष म्हणजे सत्ताधारी महायुतीतील तिन्ही प्रमुख पक्षांमध्ये त्याची प्रचिती येत आहे.

रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तिन्ही जिल्ह्यांमध्ये प्रभावशाली राजकीय घराण्यांनी आपले वर्चस्व निर्माण केले आहे. काही घराण्यांमध्ये खासदार, आमदार आणि मंत्री अशी सर्वच महत्त्वाची पदे आहेत, तर काही ठिकाणी एकाच कुटुंबातील दोन सदस्य विधानसभेत प्रतिनिधित्व करत आहेत. त्यामुळे कोकणातील राजकारणात नव्या नेतृत्वापेक्षा राजकीय वारसालाच अधिक प्राधान्य मिळत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

**रायगडमध्ये तटकरे घराण्याचे वर्चस्व**

रायगड जिल्ह्याचे राजकारण गेली अनेक दशके तटकरे कुटुंबाभोवती फिरत असल्याचे चित्र आहे. सुनील तटकरे यांनी आमदार, मंत्री आणि खासदार म्हणून जिल्ह्यात मजबूत राजकीय पकड निर्माण केली. त्यांच्या कन्या आदिती तटकरे या आमदार असून सध्या राज्य मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री आहेत.

आता सुनील तटकरे यांचे पुत्र अनिकेत तटकरे विधान परिषद निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांची निवड झाल्यास एकाच घरात



खासदार, मंत्री आणि आमदार अशी तिहेरी राजकीय ताकद निर्माण होणार आहे.

**रत्नागिरीत सामंत बंधूंची ताकद**

रत्नागिरी जिल्ह्यात मंत्री उदय सामंत हे गेली दोन दशके प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या भावाला किरण सामंत यांना विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळाली आणि ते आमदार म्हणून निवडून आले. त्यामुळे सामंत कुटुंबात एक भाऊ मंत्री तर दुसरा आमदार असे राजकीय समीकरण निर्माण झाले आहे.

**सिंधुदुर्गात राणे घराण्याचा प्रभाव कायम**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात राणे कुटुंबाचा प्रभाव अनेक वर्षांपासून कायम आहे. नारायण राणे यांनी मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री अशी विविध महत्त्वाची पदे भूषविली असून सध्या ते खासदार आहेत. त्यांचे पुत्र नितेश राणे राज्य मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री आहेत, तर निलेश राणे हे आमदार आहेत. त्यामुळे एकाच घरात खासदार, मंत्री आणि आमदार अशी तिहेरी राजकीय ताकद राणे कुटुंबाकडे आहे.

**कार्यकर्त्यांसाठी शिस्त, घराण्यांसाठी सवलत?**

कोकणातील घराणेशाहीच्या वाढत्या प्रभावासोबतच आणखी एक मुद्दा राजकीय वर्तुळात चर्चेत आहे. निवडणुका जवळ आल्या की अनेक इच्छुक उमेदवार मैदानात उतरण्याची तयारी करतात. मात्र उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच काही इच्छुकांना "महायुतीचा धर्म पाळा", "पक्षहिताला प्राधान्य द्या", "वरिष्ठांचा निर्णय मान्य करा" असे संदेश दिले जात असल्याची चर्चा आहे.

राजकीय निरीक्षकांच्या मते, हे संदेश बहुतांश वेळा सामान्य कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांसाठी असतात. अंतिम क्षणी उमेदवारीचा हार मात्र घरातीलच एखाद्या सदस्याच्या गळ्यात पडतो, असे चित्र वारंवार दिसून येत असल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये आहे. त्यामुळे अनेक इच्छुकांना माघार घ्यावी लागते, तर काहींना पक्षशिस्तीच्या नावाखाली शांत राहण्याचा सल्ला दिला जातो.

एकीकडे कार्यकर्त्यांना त्याग, निष्ठा आणि पक्षशिस्तीचे धडे दिले जातात, तर दुसरीकडे सत्ता, पदे आणि उमेदवारी यांचा वारसा घराघरांतून पुढे नेला जातो. त्यामुळे "पक्ष मोठा की परिवार?" हा प्रश्न तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये अधिक तीव्रतेने उपस्थित केला जात आहे.

**कार्यकर्त्यांचा प्रश्न अनुत्तरित**

राजकीय नेते मोठे निर्णय घेताना कार्यकर्त्यांना विश्वासात घेण्याची भाषा करतात. मात्र उमेदवारी देण्याची वेळ आली की कुटुंबीयांनाच प्राधान्य दिले जाते, अशी टीका वारंवार होत असते. एकेकाळी काँग्रेसवर घराणेशाहीचे आरोप करणारे अनेक पक्ष आणि नेते आज त्याच मार्गावर चालत असल्याचे चित्र दिसत आहे.

**जनतेसमोर प्रश्न**

लोकशाहीत नेतृत्वाचा वारसा हा अखेरीस जनतेच्या मतांवर ठरत असला तरी पक्षातील सामान्य कार्यकर्त्यांना संधी कितपत मिळते, हा प्रश्न कायम आहे. कोकणातील अनेक कार्यकर्त्यांच्या वाट्याला टाळ्या, झेंडे आणि पक्षनिष्ठेची प्रमाणपत्रे येतात; तर सत्ता, पदे आणि उमेदवारी काही मोजक्या घराण्यांच्या वाट्याला जातात, अशी भावना व्यक्त होत आहे.

कोकणातील राजकारणाचा प्रवास लोकशाहीकडून घराणेशाहीकडे तर होत नाही ना, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. नव्या नेतृत्वासाठी राजकारणाचे दरवाजे खरोखर खुले आहेत की काही निवडक आडनावांसाठीच राखीव आहेत, याचे उत्तर जनतेला आणि कार्यकर्त्यांना अपेक्षित आहे.

## पिकविमा रक्कम तात्काळ मिळण्यासाठी आमदार जितेश अंतापूरकर यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली मागणी

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे :** आमदार जितेश रावसाहेब अंतापूरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेत देगलूर बिलोली विधाससभा मतदारसंघातील प्रलंबित महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना मंजूर पिकविमा रक्कम तात्काळ वाटप करण्याची मागणी केली आहे. दरम्यान देगलूर तालुक्यातील सात पैकी फक्त चार महसूल मंडळांमध्येच पिकविमा रक्कम वितरित झाली आहे,तर देगलूर,खानापूर आणि मरखेल या विभागातील शेतकरी अजूनही या लाभापासून वंचित आहेत.त्याचप्रमाणे,बिलोली तालुक्यातील बिलोली व कुंडलवाडी महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना देखील पिकविमा रक्कम मिळालेली नाही.खरीप हंगाम तोंडावर आला असून, बियाणे,खते,औषधे आणि इतर आवश्यक वस्तू खरेदीसाठी आर्थिक मदत मिळवणे शेतकऱ्यांसाठी



अत्यंत गरजेचे आहे.प्रलंबित पिकविमा रक्कम तात्काळ वितरित झाल्यास,या शेतकरीवर्गाला मोठा दिलासा मिळेल आणि खरीप हंगामाची तयारी सुलभ होईल,असा विश्वास व्यक्त केला आहे.आमदार जितेश रावसाहेब अंतापूरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे संबंधित विभागांनी त्वरित लक्ष देऊन,पिकविमा वाटप तात्काळ करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

## केळगावमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू; ग्रामस्थांना दिलासा

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील केळगाव येथे निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या समस्येची दखल घेत, पंचायत समिती सदस्या सौ. तुळसाबाई अंकुश कोठाळे यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे गावात टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू करण्यात आला आहे.

केळगावमधील नागरिकांना जाणवत असलेल्या पाणीटंचाईचे गांभीर्य लक्षात घेऊन, पंचायत समिती सदस्या सौ. तुळसाबाई अंकुश कोठाळे यांनी पंचायत समितीच्या सभापती सौ. अनिता सुरेश बनकर यांच्याकडे या समस्येचा अधिकृत प्रस्ताव सादर केला होता. या पाठपुराव्याची तातडीने दखल घेत, पंचायत समिती प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही पूर्ण करून गावात पिण्याच्या पाण्यासाठी टँकर मंजूर केला आहे.

याबाबत बोलताना सभापती सौ. अनिता सुरेश बनकर यांनी सांगितले की, "तालुक्यातील ज्या ग्रामपंचायतींकडून पाणीटंचाईबाबतचे प्रस्ताव



नियमानुसार प्राप्त होत आहेत, त्या गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यास प्रशासन प्राधान्य देत आहे. नागरिकांची पिण्याच्या पाण्याची अडचण दूर करण्यासाठी पंचायत समिती प्रशासन पूर्णपणे सतर्क आहे. ज्या गावांमध्ये पाणीटंचाईची समस्या आहे, त्यांनी तातडीने पंचायत समितीकडे प्रस्ताव सादर करावेत, जेणेकरून प्रशासकीय कार्यवाही वेळेत पूर्ण करता येईल."पाणीपुरवठा सुरू झाल्याने केळगाव ग्रामस्थांनी पंचायत समिती सदस्या सौ. तुळसाबाई अंकुश कोठाळे, सभापती सौ. अनिता सुरेश बनकर व पंचायत समिती प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत.

## भराडीच्या ज्ञानविकास विद्यालयाचे तीन विद्यार्थी सैन्यदलात दाखल

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील भराडी येथील अशोकदादा गरुड शैक्षणिक समूहाच्या ज्ञानविकास विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मेहनत व परिश्रमांच्या जोरावर मैदानीसह लेखी परीक्षेत घवघवित यश संपादन करत सैन्यदलात निवड होण्याचा बहुमान मिळवला आहे.



सैन्यदलात निवड झालेल्यांमध्ये करण संतोष मेहेर (सोनप्पावाडी), शुभम उत्तम बनकर (आमदाबाद) आणि युवराज मंगलसिंग राजपूत (सोनप्पावाडी) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या यशाबद्दल अशोकदादा गरुड शैक्षणिक समूहाच्या ज्ञानविकास विद्यालयाच्या वतीने या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## चोरंबा ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराबाबत माहिती अधिकार अर्ज दाखल

**दैनिक युवक आधार**

**(प्रतिनिधी): विश्वदीप कांबळे** : चोरंबा ग्रामपंचायतीमध्ये लाखो रुपयांच्या कथित भ्रष्टाचाराचा आरोप करत पत्रकार कान्हा खानसोळे यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत (RTI) अर्ज दाखल केला आहे. ग्रामपंचायतीतील विविध विकासकामे, निधी खर्च आणि प्रशासकीय व्यवहारांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

कान्हा खानसोळे यांनी सरपंच आणि ग्रामसेवक यांच्यावर प्रश्न उपस्थित करत संबंधित कामांची माहिती, मंजूर निधी, खर्चाचे तपशील, कामांचे



मोजमाप पुस्तके तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची मागणी केली आहे. ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता राहावी आणि नागरिकांसमोर वस्तुस्थिती यावी, यासाठी माहिती अधिकाराचा वापर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.दरम्यान, या आरोपांबाबत सरपंच व ग्रामसेवक यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

माहिती अधिकारातून मिळणाऱ्या कागदपत्रांनंतरच आरोपांची सत्यता स्पष्ट होणार असल्याने या प्रकरणाकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे. चोरंबा ग्रामपंचायतीतील या कथित गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी काही नागरिकांकडून करण्यात येत आहे. RTI मधून मिळणाऱ्या माहितीनंतर या प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

वरील वृत्तातील आरोप अर्जदाराने केलेले आहेत.

संबंधित आरोपांची अधिकृत चौकशी व पडताळणी होणे बाकी आहे.

# महाराष्ट्रातील गोपाळ समाजाचा बुलंद आवाज मच्छिंद्र दादा गव्हाणे

## मच्छिंद्र दादा गव्हाणे यांचे कार्य म्हणजे संघर्ष, समर्पण आणि समाजसेवेचा प्रेरणादायी अध्याय

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशीम आजच्या स्वार्थी युगात स्वतःसाठी जगणारी माणसे भरपूर दिसतात; पण स्वतःच्या कुटुंबापेक्षा समाजाला प्राधान्य देणारी, समाजाच्या वेदना स्वतःच्या वेदना मानणारी आणि अन्यायाविरुद्ध वीजेच्या वेगाने उभी राहणारी व्यक्तिमत्त्वे फारच दुर्मिळ असतात. अशाच दुर्मिळ आणि धडाडीच्या नेतृत्वाचे नाव म्हणजे मच्छिंद्र दादा गव्हाणे.

गोपाळ समाजाचे नाव अनेकांना माहीतही नव्हते, अशा काळात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात गोपाळ समाजाची ओळख निर्माण करण्याचे ऐतिहासिक कार्य मच्छिंद्र दादांनी केले. त्यांनी सुरू केलेले "गोपाळ समाज युवक जोडा अभियान" हे केवळ एक संघटन नसून हजारो युवकांच्या आशा, आकांक्षा आणि संघर्षांचे व्यासपीठ बनले आहे.

मच्छिंद्र दादा गव्हाणे यांचा सामाजिक प्रवास हा कोणत्याही एका दिवसात घडलेला नाही. समाजासाठी काम करण्याची तळमळ त्यांच्या रक्तातच आहे. गोपाळ समाज युवक जोडा अभियानाची स्थापना करण्यापूर्वीही त्यांनी समाजातील विविध संघटनांमध्ये राहून निस्वार्थपणे काम केले आहे. विशेष म्हणजे, त्यांनी कधीही पद, प्रतिष्ठा किंवा सत्तेची लालसा बाळगली नाही. समाजहित हेच त्यांचे ध्येय राहिले आणि आजही ते त्याच निष्ठेने कार्यरत आहेत.

समाजकारणाच्या प्रवासात त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला. काही स्वार्थी प्रवृत्तीच्या लोकांनी समाजाचा वापर स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर काही समाजबांधवांनीही मच्छिंद्र दादांना डावलण्याचे, त्यांचे कार्य थांबवण्याचे आणि त्यांची वाट अडवण्याचे प्रयत्न केले. मात्र संघर्ष हा त्यांच्या स्वभावातच असल्याने त्यांनी कोणत्याही टीकेला किंवा अडथळयाला न जुमानता आपली समाजसेवेची झुंज अधिक जोमाने सुरू ठेवली.

"खरे नेतृत्व पदावरून सिद्ध होत नाही, तर संकटांच्या वादळातही समाजासाठी ठामपणे उभे राहण्यातून सिद्ध होते; आणि मच्छिंद्र दादा गव्हाणे यांनी हे वारंवार सिद्ध करून दाखवले आहे."

त्यांनी कधीच पदासाठी समाजकार्य केले नाही. त्यांचे एकमेव स्वप्न म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासाच्या पहिल्या पानावर




गोपाळ समाजाची ओळख ठळकपणे निर्माण व्हावी. शासन दरबारी समाजाच्या प्रश्नांची अधिकृत नोंद व्हावी, समाजबांधवांना न्याय मिळावा आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचाव्यात यासाठी ते सातत्याने धडपड करत आहेत.

आज महाराष्ट्रभर फिरताना मच्छिंद्र दादा गव्हाणे यांचे एकच ध्येय दिसते—"समाज संघटित झाला तरच समाज सक्षम होईल." या विचारातून त्यांनी हजारो युवकांना एकत्र आणले आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे अनेक तरुणांना समाजकारणाची नवी दिशा मिळाली असून गोपाळ समाजाला एक नवी ओळख, नवा आत्मविश्वास आणि नव्या युगाची ताकद प्राप्त झाली आहे.समाजावर अन्याय झाला, एखाद्या कुटुंबावर संकट कोसळले, कुणी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले किंवा शासकीय यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे एखादा समाजबांधव त्रस्त झाला, तर मच्छिंद्र दादा केवळ सोशल मीडियावर पोस्ट करून थांबत नाहीत. ते स्वतः त्या कुटुंबाच्या दारात पोहोचतात. त्यांच्या डोळयातील अश्रू पुसण्याचा प्रयत्न करतात. गरज पडल्यास आर्थिक मदत करतात. प्रशासनाकडे पाठपुरावा करतात आणि न्याय मिळेपर्यंत संघर्ष करतात."अन्याय करणाऱ्यांपेक्षा अन्याय सहन करणाऱ्यांची संख्या जास्त असते; पण त्या लाखोंच्या वेदनांना आवाज देणारे नेतृत्व क्वचितच जन्माला येते. मच्छिंद्र दादा गव्हाणे हे त्या नेतृत्वाचे नाव आहे."आज अनेकजण समाजसेवेच्या नावाखाली प्रसिद्धी शोधतात; मात्र मच्छिंद्र दादांचे कार्य प्रसिद्धीसाठी नाही तर समाजाच्या अस्तित्वासाठी आहे. विशेष म्हणजे त्यांनी केलेल्या कामासाठी कधीही कोणाकडून मोबदला मागितलेला नाही. उलट स्वतःच्या खिशातील पैसे खर्च करून ते समाजबांधवांच्या मदतीसाठी धाव घेतात. ही गोष्ट त्यांना इतरांपेक्षा वेगळे आणि मोठे बनवते.

सध्याच्या काळात प्रत्येकजण स्वतःच्या आयुष्यात व्यस्त असताना दुसऱ्यांच्या दुःखात सहभागी होणारे लोक फार कमी दिसतात. परंतु मच्छिंद्र दादा गव्हाणे हे त्याला अपवाद ठरतात. स्वतःच्या सुख-दुःखापेक्षा समाजाच्या समस्या त्यांना अधिक महत्त्वाच्या वाटतात. अनेकदा स्वतःच्या कुटुंबापेक्षा समाजाला प्राधान्य देत त्यांनी असंख्य कुटुंबांच्या अडचणी सोडवण्यासाठी दिवस-रात्र परिश्रम घेतले आहेत.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांचा अभ्यास, प्रभावी वक्तृत्व, समाजाबद्दलची तळमळ आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द. या गुणांच्या जोरावर त्यांनी हजारो युवकांना एकत्र आणले आहे. निराश झालेल्या तरुणांच्या मनात त्यांनी आत्मविश्वास निर्माण केला आहे. संघर्षाला घाबरू नका, संघटित व्हा आणि हक्कासाठी लढा, हा संदेश त्यांनी प्रत्येक युवकापर्यंत पोहोचवला आहे.

"ज्यांच्या नसानसांत समाजप्रेम वाहते, ज्यांच्या हृदयात वंचितांच्या वेदना धगधगतात आणि ज्यांच्या पावलांना अन्यायाविरुद्ध लढण्याची दिशा मिळते, त्यांनाच इतिहास नेतृत्व म्हणून ओळखतो."

**"मच्छिंद्र दादा गव्हाणे हे केवळ एक नाव नाही, तर गोपाळ समाजाच्या स्वाभिमानाची ओळख आहेत. ते केवळ नेतृत्व करत नाहीत, तर हजारो युवकांच्या स्वप्नांना दिशा देतात, संघर्षांना बळ देतात आणि समाजाला नवी उभारी देतात." मच्छिंद्र दादा गव्हाणे यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक, हार्दिक आणि मंगलमय शुभेच्छा!**

महाराष्ट्रातील गोपाळ समाजाला आज एक नवी ओळख, नवी ऊर्जा आणि नवा आत्मविश्वास मिळाला असेल, तर त्यामागे मच्छिंद्र दादा गव्हाणे यांचे अथक परिश्रम आणि निस्वार्थ कार्य मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहे. त्यांनी उभी केलेली चळवळ ही केवळ आजची गरज नसून भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरणार आहे.

"ज्यांनी स्वतःच्या स्वार्थापेक्षा समाजाचा विचार मोठा मानला, ज्यांनी पदापेक्षा कर्तृत्वाला महत्त्व दिले आणि ज्यांनी संघर्षाला आपली ओळख बनवली, अशा मच्छिंद्र दादा गव्हाणे यांचे कार्य पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणास्थान राहील."आज गोपाळ समाजाला राज्यभरात मिळालेली नवी ओळख, युवकांमध्ये निर्माण झालेली जागृती आणि हक्कासाठी लढण्याची निर्माण झालेली ताकद ही मोठ्या प्रमाणात मच्छिंद्र दादा गव्हाणे यांच्या अथक प्रयत्नांचे फळ आहे. त्यामुळेच समाजातील अनेक तरुण त्यांना केवळ नेता म्हणून नव्हे तर मार्गदर्शक, प्रेरणास्थान आणि संघर्षाची शाळा म्हणून पाहतात.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीकृष्ण चरणी प्रार्थना की, त्यांना उदंड आयुष्य, निरोगी आरोग्य, अखंड ऊर्जा आणि समाजसेवेचे अधिक बळ लाभो. त्यांनी सुरू केलेली ही संघर्षाची मशाल अधिक तेजाने प्रज्वलित होत राहो आणि महाराष्ट्रातील प्रत्येक युवकाला न्याय, स्वाभिमान आणि संघटनशक्तीचा मार्ग दाखवत राहो.

**शब्दांकन..**
**– करण धोंगडे**
**दैनिक युवक आधार,**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी.**
**वाशिम जिल्हा अध्यक्ष**
**निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार**
**संघ महाराष्ट्र राज्य.**

# भराडीत माजी विद्यार्थ्यांचा अभिनव उपक्रम; १२० विद्यार्थ्यांना मोफत शिकवणी

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया भक्कम व्हावा, या हेतूने भराडी ( ता. सिल्लोड ) येथील इयत्ता दहावीच्या सन २००३ व २००४ च्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत आयोजित केलेल्या उन्हाळी सुटीतील मोफत शिकवणी वर्गाचा समारोप नुकताच झाला. १५ एप्रिल ते २९ मे २०२६ या कालावधीत चाललेल्या या उपक्रमात परिसरातील १२० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून विविध विषयांचे ज्ञान आत्मसात केले.



**समाजाचे देणे लागण्याची भावना**

**या उपक्रमात योगदान देणारे माजी विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. कोणी नामांकित नोकरीत, कोणी व्यावसायिक, तर कोणी शेती किंवा मजुरी करून उपजिविका चालवत आहेत. मात्र, 'आपण समाजाचे देणे लागतो' या भावनेतून हे सर्व माजी विद्यार्थी आपल्या व्यस्त जीवनातून वेळ काढून आणि लोकवर्गणीतून हा उपक्रम दरवर्षी सेवाभावी वृत्तीने राबवत आहेत.**

या उपक्रमांतर्गत इंग्रजी व्याकरण, मूलभूत गणित आणि वैदिक गणिताचे तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. निरोप समारंभाप्रसंगी छत्रपती संभाजीनगर येथील करिअर समुपदेशक प्रविण कादी यांनी विद्यार्थ्यांना करिअर नियोजनाचे महत्त्व पटवून दिले. उपक्रमाचे आयोजक व माजी विद्यार्थ्यांनी लोकवर्गणीतून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, पुस्तके आणि पर्यावरण दिनाचे औचित्य साधून फळझाडांची रोपे भेट दिली.

यावेळी नारायण खोमणे, गजानन महाजन, दीपक सोनावणे, डॉ. शैलेश काळे, संतोष जगनाडे आणि रायभान जाधव यांनी मार्गदर्शन केले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रदीप शेळके, ऋषिकेश सोनटक्के, समाधान चाथे, रोहिणी राकडे, विक्की अग्रवाल, काशिनाथ शिंदे, योगेश सोनवणे, सागर त्रिवेदी, सोनम अग्रवाल, अंकुश सोनवणे, नागेश्वर महाजन, संतोष चापायतकर, अजय राकडे, अजिनाथ वाडेकर, बद्रीनाथ काळे व सचिन देवगैय्या आदी माजी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# पेट्रोल-डिझेल दरवाढ व महागाई विरोधात सिल्लोडमध्ये वंचित बहुजन आघाडीचा 'रास्तारोको'

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी सिल्लोड:-** भारतीय जनता पक्षाच्या सरकारने पेट्रोल, डिझेल, गॅस व सीएनजी दरात भरमसाठ वाढ करून सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले आहे. महागाईने पिचलेल्या जनतेला इंधन दरवाढ करून मोदी सरकारने महागाईच्या खाईत लोटले आहे, असा आरोप करत वंचित बहुजन आघाडीतर्फे माजी नगराध्यक्ष बनेखा पठाण यांच्या नेतृत्त्वाखाली सिल्लोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे तीव्र 'रास्तारोको' आंदोलन करण्यात आले.



यावेळी बनेखा पठाण यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आंदोलनादरम्यान नागरिकांना मेलोडी चॉकलेट वाटप केले, तसेच नरेंद्र मोदी सरकार व फडणवीस सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी बोलताना बनेखा पठाण म्हणाले की, पेट्रोल नाही, डिझेल नाही, गॅस सिलेंडर गायब आहे, इंधनाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत, शेतमालाला भाव नाही, जनता हवालदिल आहे पण भाजप सरकार मात्र मस्तीत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशासाठी पनौती आहेत, ते सत्तेत आल्यापासून देशातील जनतेवर वरवंटा फिरवत आहेत. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे धादांत खोटे बोलत आहेत. पेट्रोल-डिझेलचा मुबलक साठा आहे असे जर त्यांना वाटत असेल, तर जनता भर दुपारी कडक उन्हात पेट्रोल पंपावर काय ऊन खायला रांगा लावत आहेत का? कोणी साठेबाजी केली असेल तर त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे, असेही पठाण यांनी यावेळी ठणकावून सांगितले.

महागाई विरोधात वंचित बहुजन आघाडीतर्फे हे आंदोलन करण्यात येत असताना सिल्लोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात महामार्गावर दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

# परभणी येथे गुणवंत विद्यार्थी यांच्या सत्काराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत :** महाराष्ट्र नाभिक महामंडळ शाखा परभणी च्या वतीने गेली 22 वर्षे 10 वी व 12 वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. तसेच याही वर्षी दि. 6 जून 2026 रोजीसकाळी 11 वा सखा गार्डन जिंतूर रोड परभणी येथे10 वी व 12वी गुणवंत विद्यार्थी यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमासाठी भगवानराव वाघमारे (मा. उपमहापौर परभणी), कल्याणराव दळे (ओबीसी नेते प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र नाभिक महामंडळ), दत्तराव राऊत (लेखा अधिकारी शिक्षण परभणी), विजय मोरे(नायब तहसीलदार सेलू), संगीताताई घोडके (अंगणवाडी प्रवेशिका मानवत), दामोदर बिडवे (प्रदेश कार्याध्यक्ष म.ना.म), पांडुरंग भवर, सुरेंद्र कावरे,युवराज शिंदे, कृष्णा कंठाळे, संपतराव सवणे,अदी. मान्यवर उपस्थित राहणार असून. तरी सर्व नाभिक समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन महाराष्ट्र नाभिक महामंडळ शाखा परभणी च्या वतीने करण्यात आले आहे.

# महिला पोलीस उपनिरीक्षकाला २० हजार रुपयांची लाच घेताना एसीबीने रंगेहात पकडले

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) नागपूर पथकाने वाठोडा पोलीस ठाण्यात कार्यरत महिला पोलीस उपनिरीक्षकाला २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडून मोठी कारवाई केली आहे. या घटनेमुळे पोलीस विभागात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या एका महिलेविरुद्ध केलेल्या तक्रारीची चौकशी महिला पोलीस उपनिरीक्षक प्रणाली बंके यांच्याकडे होती. सदर प्रकरणात संबंधित महिलेविरुद्ध कारवाई न करण्यासाठी तसेच तक्रार मागे घेण्यासाठी तक्रारदाराकडे २० हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. तक्रारदाराने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर येथे तक्रार दाखल केली.

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीने सापळा रचला. पडताळणीदरम्यान पोलीस उपनिरीक्षक प्रणाली बंके यांनी २० हजार रुपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर २ जून २०२६ रोजी सापळा कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान त्यांनी तक्रारदाराकडून २० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना रंगेहात ताब्यात घेण्यात आले.या प्रकरणी वाठोडा पोलीस ठाणे, नागपूर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.सदर कारवाई डॉ. दिग्विजय प्रधान, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर, माधुरी वटकर, अपर पोलीस अधीक्षक, तसेच विजय महाडकर, उपअधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक राजेश सहारे, पोलीस निरीक्षक योगेश वाघमारे, महिला पोलीस अंमलदार अंजना बावणे, सरिता मेश्रेम, अर्चना बोडखे, पोना मिर्झी अन्सारी तसेच वाहनचालक महादेव भसकर यांनी सहभाग घेतला.

**नागरिकांना एसीबीचे आवाहन**

शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी कोणत्याही कामासाठी कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त लाचेची मागणी करत असल्यास नागरिकांनी तत्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते आणि लाचेची रक्कम सापळा यशस्वी झाल्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेनुसार परत मिळवून दिली जाते, असे एसीबीने स्पष्ट केले आहे. ही कारवाई भ्रष्टाचाराविरुद्ध एसीबीच्या कठोर भूमिकेचे आणखी एक उदाहरण मानली जात असून, शासकीय यंत्रणेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी अशा कारवाया महत्त्वाच्या ठरत आहेत.

# स्वतःसाठी एक तरी झाड लावा - उद्धव बाबर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** जगापुढे आज उभा ठाकलेला सर्वात भीषण आणि गहन प्रश्न म्हणजे वाढते जागतिक तापमान होय. औद्योगिकीकरण, बेसुमार वृक्षतोड, वाढते प्रदूषण, जलस्रोतांचा ऱ्हास आणि नैसर्गिक संसाधनांचा होत असलेला अतिरेकी वापर यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत असून त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण मानवजातीला भोगावे लागत आहेत. अशा



परिस्थितीत प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेत "एक तरी झाड लावा... स्वतःसाठी!" हा संकल्प अंगीकारावा, असे आवाहन महाराष्ट्र शासनाच्या कृषी भूषण सेंद्रिय शेती पुरस्कारप्राप्त आणि पर्यावरणप्रेमी उद्धव बाबर यांनी जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर केले आहे.उद्धव बाबर म्हणाले, गेल्या काही दशकांमध्ये पृथ्वीच्या सरासरी तापमानात सातत्याने वाढ होत आहे. या तापमानवाढीमुळे ऋतुचक्रात मोठे बदल होत असून अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा, पूर आणि वादळांसारख्या नैसर्गिक आपत्तींची तीव्रता वाढली आहे. याचा थेट परिणाम शेती, जलसंपदा, जैवविविधता आणि मानवी आरोग्यावर होत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी वर्गाला हवामान बदलाचे सर्वाधिक चटके बसत असून कृषी क्षेत्र मोठ्या संकटाला सामोरे जात आहे.ते म्हणाले, जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने निसर्गाशी आपले नाते अधिक दृढ करण्याचा संकल्प करावा. वाढत्या तापमानाला आणि पर्यावरणीय ऱ्हासाला रोखण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन हा सर्वात प्रभावी आणि शाश्वत मार्ग असून, "एक तरी झाड लावा... स्वतःसाठी, आपल्या कुटुंबासाठी आणि भविष्यातील पिढ्यांसाठी", असा संदेश उद्धव बाबर यांनी दिला.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# योगेश सदाशिव तागड यांची पोलीस दलात दमदार झेप!

## ग्रामीण भागातील जिद्दी युवकाने सिद्ध केले कर्तृत्व ; गोपाळ समाज, बोरगाव आणि मालेगाव तालुक्याचा वाढविला मान

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : बोरगाव, मालेगाव तालुक्यातील बोरगाव या छोट्याशा गावातील होतकरू युवक योगेश सदाशिव तागड यांची नागपूर पोलीस कारागृह विभागात निवड झाल्याने संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अत्यंत हालाखीच्या परिस्थितीतून मार्ग काढत, कठोर परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी हे यश मिळविले असून त्यांच्या या यशामुळे बोरगावसह संपूर्ण मालेगाव तालुक्याचा अभिमान उंचावला आहे.

घरची आर्थिक परिस्थिती बेताची असताना अनेक युवक आपली स्वप्ने अर्धवट सोडून देतात. मात्र योगेश यांनी परिस्थितीला शरण न जाता तिला आव्हान मानले. आपल्या कुटुंबाची परिस्थिती डोळ्यासमोर ठेवून त्यांनी दिवस-रात्र मेहनत घेतली. भरतीच्या तयारीदरम्यान अनेक संकटे आली, काही वेळा अपयशाचा सामना करावा लागला, परंतु त्यांनी हार मानली नाही. कारण त्यांना विश्वास होता की, अपयश हे यशाकडे जाणाऱ्या मार्गावरील एक पायरी असते. अखेर त्यांच्या अथक प्रयत्नांना यश मिळाले आणि त्यांनी पोलीस दलात स्थान मिळवून दाखविले.

विशेष म्हणजे, आजच्या स्पर्धेच्या युगात दहावीपर्यंत तसेच बारावीपर्यंत कोणत्याही प्रकारचे खासगी कोचिंग क्लासेस न लावता



योगेश यांनी आपल्या शिक्षणाचा भक्कम पाया उभारला. ग्रामीण भागात उपलब्ध असलेल्या मर्यादित साधनसामग्रीचा उपयोग करून त्यांनी स्वतःच्या जिद्दीच्या जोरावर शिक्षण पूर्ण केले. त्यामुळे एका ग्रामीण भागातील मुलगा इच्छाशक्ती आणि मेहनतीच्या जोरावर किती मोठी झेप घेऊ शकतो, हे योगेश यांनी कृतीतून दाखवून दिले आहे.

आज अनेक पालक आणि विद्यार्थी यशासाठी महागडे कोचिंग क्लासेस आवश्यक असल्याचे मानतात. मात्र योगेश यांची यशोगाथा ही त्या समजुतीला छेद देणारी आहे. योग्य ध्येय, सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठे यश मिळवू शकतात, हे त्यांनी सिद्ध केले आहे.

त्यांच्या या यशामुळे केवळ त्यांच्या कुटुंबाचाच नव्हे तर गोपाळ समाजाचाही गौरव वाढला आहे. समाजातील युवकांसाठी ते

**"परिस्थिती कितीही कठीण असो, जिद्द आणि मेहनतीसमोर कोणतीही अडचण मोठी नसते," हे योगेश सदाशिव तागड यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे. त्यांच्या यशाने ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळाली आहे.**

**श्री.पांडुरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळा या संस्थेतून योगेश यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, शिस्त, संस्कार आणि स्पर्धात्मक दृष्टिकोन देण्याचे काम ही संस्था सातत्याने करत आहे. योगेश यांच्या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून विद्यालयाच्या शिक्षकवृंदासाठीही हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.**

प्रेरणास्थान बनले असून त्यांच्या यशामुळे अनेक तरुणांमध्ये नवी उमेद निर्माण झाली आहे. बोरगाव गाव, गोपाळ समाज आणि मालेगाव तालुक्याचे नाव राज्यभर पोहोचविण्याचे काम त्यांनी केले आहे.योगेश यांच्या निवडीची बातमी समजताच मित्रपरिवार, गुरुजन, सामाजिक कार्यकर्ते, नातेवाईक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. सोशल मीडियावरही त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी योगेश सदाशिव तागड यांची यशोगाथा ही केवळ एक निवड नसून संघर्ष, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर स्वप्ने कशी साकार करता येतात याचा प्रेरणादायी आदर्श आहे.

एका खेड्यातून एवढी मोठी झेप घेणे ही साधी गोष्ट नाही आणि हे करून दाखवून योगेश यांनी अनेक तरुणांसमोर यशाचा नवा मार्ग खुला केला आहे.

# एल निनोचे सावट : खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी सज्ज राहण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर आणि यंदा एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे नैऋत्य मोसमी पाऊस अनिश्चित राहण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी खरीप हंगामाचे योग्य नियोजन करावे, असे आवाहन सहाय्यक कृषी अधिकारी आर. एन. साठे यांनी केले आहे. भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार जून ते सप्टेंबर या कालावधीत देशात सरासरीच्या सुमारे ९२ टक्के पाऊस होण्याची शक्यता असून, एल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी होणे, पावसात खंड पडणे किंवा पावसाचे असमान वितरण होणे यासारखी परिस्थिती उद्भवू शकते.

सहाय्यक कृषी अधिकारी साठे यांनी सांगितले की, एल निनो ही प्रशांत महासागराच्या पृष्ठभागावरील पाण्याचे तापमान सामान्यपेक्षा जास्त होण्याची नैसर्गिक प्रक्रिया आहे. यामुळे जगभरातील हवामानाच्या पद्धतींमध्ये बदल होतात आणि भारतातील मान्सून पावसावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता वाढते.



एल निनोमुळे मान्सून पावसाचे प्रमाण घटणे, दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होणे, पाणीटंचाई, तापमानात वाढ व उष्णतेच्या लाटांचा सामना करावा लागणे तसेच पिकांच्या उत्पादनात घट होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी पीक नियोजन, माती व पाणी व्यवस्थापन तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यासाठी कमी पाण्याची गरज असलेली व दुष्काळ सहनशील पिके व वाणांची निवड करावी. पेरणी योग्य वेळी करून आंतरपीक व मिश्र पीक पद्धतीचा अवलंब करावा. शेतात सेंद्रिय खत, कंपोस्ट व शेणखताचा वापर वाढवून मल्चिंग, ठिबक व तुषार सिंचन पद्धतींचा अवलंब करावा. तसेच शेततळे, गाळकूप आणि पावसाच्या पाण्याची साठवणूक यावर भर देत विहीर व बोअरवेलमधील पाण्याचा काटकसरीने वापर करावा.

पिकांच्या वाढीवर नियमित लक्ष ठेवून सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करणे, कीड व रोग व्यवस्थापनावर भर देणे तसेच जनावरांसाठी चाऱ्याचा साठा करून ठेवणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. हवामानाचा अंदाज नियमित पाहून कृषी विभागाच्या मार्गदर्शनाचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी उशिराने पेरणी करणे टाळावे, जास्त पाण्याची गरज असलेली पिके घेऊ नयेत, एकाच पिकावर अवलंबून राहू नये तसेच पाण्याचा अपव्यय टाळावा. रासायनिक खते व कीटकनाशकांचा अतिरेकी वापर करू नये आणि निकृष्ट बियाण्यांपासून दूर राहावे, असेही साठे यांनी स्पष्ट केले.

एल निनोच्या संभाव्य परिस्थितीत सोयाबीन, तूर, मूग, उडीद, भुईमूग, ज्वारी आणि बाजरी यांसारखी पिके तुलनेने अधिक उपयुक्त ठरू शकतात, असे कृषी विभागाने सुचविले आहे.

दरम्यान, खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाकडून प्रत्येक गावात विविध जनजागृती मोहिमा राबविण्यात येत आहेत. बियाणे उगवण क्षमता चाचणी, बीज प्रक्रिया, हुमणी अळी नियंत्रण, बीबीएफ व सीआरए तंत्रज्ञान, माती नमुना प्रात्यक्षिके, एकात्मिक कीड व्यवस्थापन, शून्य मशागत, सापळा पिके, जैविक निविष्ठा, शंखी गोगलगाय निर्मूलन, ऊस पाचट व्यवस्थापन आदी सुमारे २५ विविध मोहिमांद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.या मोहिमा व कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन बदलत्या हवामानाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शेतकऱ्यांनी सज्ज राहावे, असे आवाहन सहाय्यक कृषी अधिकारी आर. एन. साठे यांनी केले आहे.

# राज्यातील रस्त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी AIIB व NDB अर्थसहाय्याला मंत्रिमंडळाची मान्यता

**दैनिक युवक आधार**

**मुंबई /प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या राज्यातील रस्ते सुधारणा प्रकल्पांना महत्त्वपूर्ण मंजुरी देण्यात आली आहे. आशियाई पायाभूत गुंतवणूक बँक (AIIB) तसेच न्यू डेव्हलपमेंट बँक (NDB) यांच्या अर्थसहाय्यांतर्गत राज्यातील रस्त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुमारे २४,८८४ कोटी रुपयांचे प्रकल्प राबविण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत AIIB कडून एकूण १००० दशलक्ष अमेरिकन डॉलर (अंदाजे ८,७०० कोटी रुपये) इतके अर्थसहाय्य दोन टप्प्यांमध्ये उपलब्ध होणार आहे. पहिल्या टप्प्यात ५०० दशलक्ष अमेरिकन डॉलर अर्थसहाय्य व २१५ दशलक्ष अमेरिकन डॉलर शासन सहभाग असा एकूण ७१५ दशलक्ष अमेरिकन डॉलर (सुमारे ६,२२१ कोटी रुपये) खर्च अपेक्षित आहे. दोन टप्प्यांची एकूण किंमत सुमारे १२,४४२ कोटी रुपये असेल.

राज्याच्या १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टाला गती देण्यासाठी ५ हजार PCU पेक्षा अधिक वाहतूक वर्दळ आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त व्यावसायिक वाहतूक असलेल्या 'ग्रोथ कॉरिडॉर'मधील रस्त्यांच्या विकासाला या योजनेत प्राधान्य देण्यात येणार आहे.

AIIB च्या अर्थसहाय्यांतर्गत पहिल्या टप्प्यात अंदाजे ७५० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची सुधारणा EPC तत्त्वावर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत खुल्या निविदा प्रक्रियेद्वारे हाती घेण्यात येणार आहे. प्रारंभी या कामांचा खर्च राज्य शासनाकडून करण्यात येईल व त्यानंतर बहुपक्षीय विकास बँकेकडून संबंधित खर्चाची प्रतिपूर्ती केली जाईल.

याच धर्तीवर NDB च्या अर्थसहाय्यांतर्गत राज्यातील रस्त्यांच्या सुधारणेच्या प्रस्तावालाही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या योजनेअंतर्गतही पहिल्या टप्प्यात अंदाजे ७५० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यात येणार आहेत.या निर्णयामुळे राज्यातील रस्ते अधिक सुरक्षित, दर्जेदार आणि वाहतुकीस सक्षम होणार असून औद्योगिक, कृषी, पर्यटन व व्यापारी क्षेत्राच्या विकासाला मोठी चालना मिळेल तसेच राज्यातील रस्ते विकासासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.

# 7 जून रोजी तिसऱ्या मुंबई प्रकल्पा विरोधात! उरणमध्ये शेतकरी, भूमिपुत्रांचा एल्गार

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : रायगड जिल्ह्यात प्रस्तावित तिसऱ्या मुंबई प्रकल्पाविरोधात शेतकरी, भूमिपुत्र आणि ग्रामस्थांनी पुन्हा एकदा संघर्षाची भूमिका घेतली असून, नवनगर विरोधी समिती, रायगडच्या वतीने येत्या रविवार,7 जून 2026 रोजी सायंकाळी 4 वाजता चिरनेर शहीद स्मारक येथे भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

"आपली जमीन, आपले हक्क, आपले भविष्य" या घोषवाक्याखाली आयोजित करण्यात आलेल्या या सभेत तिसऱ्या मुंबई प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या शेतकरी, ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या सभेस मा. व्यायाममूर्ती बी. जी. कोळसे पाटील हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून, तिसऱ्या मुंबई प्रकल्पाच्या परिणामांबाबत ते मार्गदर्शन करणार आहेत.नवनगर विरोधी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, तिसऱ्या मुंबईच्या नावाखाली रायगड जिल्ह्यातील सुपीक शेती, गावे, घरे आणि स्थानिकांचे अस्तित्व धोक्यात येणार असल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून विकासाच्या नावाखाली स्थानिकांना विस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही समितीकडून करण्यात आला आहे. समितीने स्पष्ट भूमिका घेत, "नाही, नाही, कधीही नाही... आमच्या जमिनी देणार नाही" अशी घोषणा दिली आहे. तसेच "शेती, घरे, गावांसह आमचे अस्तित्व संपवू पाहणाऱ्या तिसऱ्या मुंबईची एकही वीट रचू देणार नाही" असा इशाराही देण्यात आला आहे. रायगडमधील शेतकरी, महिला, युवक आणि विविध सामाजिक संघटनांनी या सभेला उपस्थित राहून आपल्या हक्काच्या जमिनी, गावे आणि भविष्यासाठी एकजूट दाखवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

तिसऱ्या मुंबई प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता लक्षात घेता, चिरनेर येथील या सभेकडे संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# १२ टक्के व्याजाचे आमिष दाखवून २० लाखांची फसवणूक ; 'संभाजीनगर अर्बन'च्या १० संचालकांवर गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी सिल्लोड:-** जास्त व्याजदराचे आमिष दाखवून अंधारी परिसरातील ठेवीदारांची २० लाख ३५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी 'संभाजीनगर अर्बन मल्टीपर्पज निधी लिमिटेड'च्या १० संचालकांविरुद्ध सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी कृष्णा कचरू गोरे (वय ३९, रा. अंधारी, ता. सिल्लोड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपींनी अंधारी येथे 'संभाजीनगर अर्बन मल्टीपर्पज निधी लिमिटेड' (शॉप नंबर ४०, एन-९, पवननगर, हडको, औरंगाबाद) या संस्थेची शाखा सुरू केली होती. संचालकांनी गावातील नागरिकांना १२ टक्के आकर्षक व्याजदराचे आमिष दाखवून ठेवी, सेव्हिंग आणि पिग्मी खाते उघडण्यास प्रवृत्त केले. ठेवीदारांकडून रोख रक्कम व ठेवी स्वीकारून, मुदत संपल्यानंतरही व्याजासह मूळ रक्कम परत न करता लबाडीने व अप्रामाणिकपणे फिर्यादी व साक्षीदारांची फसवणूक केली आहे.

सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.


### गुन्हा दाखल झालेले आरोपी

**रत्नाकर सुधाकर जोशी, दिपाली सुधाकर जोशी (संचालक), सुनील रामचंद्र चोंबे (संचालक), संदीप नारायण जोशी (सदस्य), विलास सुधाकर जोशी (सदस्य), पल्लवी विलास जोशी (सदस्य), प्रशांत चंद्रकांत जोशी (सदस्य), दिपाली रत्नशील चाबुकस्वार, गणेश बाबुराव कावळे पाटील (सर्व रा. एन-६, पवननगर, टीव्ही सेंटर, छत्रपती संभाजीनगर) आणि सचिन नंदलाल वर्मा (रा. अंधारी).**

# दिवंगत पैलवान,माजी सरपंच गंगाराम तुळशीराम मुंडे यांना विनम्र अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**माहूरगड:प्रतिनिधी/सय्यद इसा** : माहूर तालुक्यातील वझरा (शे.फ.)या छोट्याश्या गावात जन्मलेले पैलवान गंगाराम मुंडे हे नेहमीच कुस्ती खेळणाऱ्या पैलवानासाठी आदर्श मार्गदर्शक राहिले आहेत.कुठेही कुस्त्याचा फड दिसलाकी गंगाराम मुंडे यांची आठवण नकळत डोळ्यासमोर येते.मैदानी खेळामध्ये गावातील युवकांनी सहभागी व्हावे असे त्यांना मनोमन वाटत असे.त्यांच्या या अफाट इच्छाशक्तीमुळे त्यांचे




दोन मुले पोलीस सेवेत कार्यरत आहेत.त्यांचे दोन पुतणे, एक पुतणी देखील पोलीस सेवेत अंमलदार पदावर राष्ट्राची सेवा करीत आहेत. मौजे वझरा हे गांव पोलिसांचे गांव म्हणून नावारूपाला आले असून या दोन हजार लोकसंख्या असलेल्या गावात जवळपास ६० पेक्षा अधिक मुले पोलीस सेवेत ताठ मानेने सेवा देत आहेत.शासकीय नोकरीचा १०० चा आकडा या गावातील युवकांनी पूर्ण केला असून मुली देखील मागे नाहीत.गंगाराम मुंडे हे सदन शेतकरी, आदर्श सरपंच व नामांकित पैलवान म्हणून पंचक्रोशीत सुप्रसिद्ध होते. त्यांचा सात भाऊ असलेला परिवार एकसंघ होता.वडिधाऱ्या व्यक्तींना मान सन्मान देण्याची परंपरा जपणारा होता. जातीपतीला थारा न देणारे घराणे म्हणून त्यांच्या घराण्याकडे आजही पाहिले जाते.त्यांनी पाहिलेले सर्व स्वप्न आज साकार झालेत परंतु ते सुख पाहण्यासाठी ते आज हयात नाहीत.त्यांचे लहान बंधू हरीश मुंडे यांच्या व्हाट्सअप डीपीवर कायम त्यांचा फोटो असून त्यांचा शब्द म्हणजे आदेश म्हणून पाळणारे हरीश हे देखील सामाजिक कार्यकर्ते आहेत.

त्यांचे बंधू प्रेम हे नवीन पिढीला प्रेरणादायी ठरणारे आहे.बलाढ्य शरीर असलेले गंगाराम मुंडे हे मनाने खुपच कोमल आणि संवेदनशील होते.

सन १९९५ मध्ये आम्ही क्रिकेट खेळण्यासाठी शेख फरीद दर्गा कडे निघालो होतो.परंतु काही सोबती येण्यासाठी उशीर होत होता म्हणून मी आणि इतर तिघे गावातील मारोती मंदिराजवळ क्रिकेट खेळण्यास सुरवात केली. त्यावेळी कॉरक बोल हा सामान्य होता. कॉरक बोल ने बाबू दोहिले बॉलिंग करीत होते व माझ्या हातात बॅट होती.सायंकाळचे साधारणतः ५ वाजले असावेत. बाबू नी बॉल टाकला तसा मी जोरात शॉट मारला आणि तो बॉल सरपंच गंगाराम मुंडे यांना लागला.त्यांना खुप त्रास झाला,त्यांनी कळकाडली आणि आरे पोरोहो हा खेळ पुन्हा गावात खेळू नका म्हणून प्रेमाणे सल्ला दिला.आम्ही सर्वजण आश्चर्य चकित झालो एवढा मोठा माणूस नामांकित पैलवान रागात कसा आला नाही.त्यांचा सहनशक्तीचा आणि प्रांजलपणाचा अंदाज आम्हाला आला. त्याच ठिकाणी इतर दुसरा व्यक्ती असता तर फार मोठे भांडण झाले असते.ते खोरोखरच महान व्यक्ती होते. आज कुठे ही कुस्त्याचा फड दिसला की गंगाराम तुळशीराम मुंडे यांची आठवण येते.सद्या मी मुंबई व पश्चिम महाराष्ट्रात असल्यामुळे एका ठिकाणी कुस्त्याचा फड दिसला आणि काळ्या मातीतील, डोंगरदऱ्यातील दिवंगत पैलवान गंगाराम मुंडे यांची आठवण आली.

त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

**शब्द संकलन:**
**कॉ.गंगाधर गायकवाड,नांदेड**
**मूळ गांव - वझरा (शेख फरीद) ता.माहूर जि.नांदेड.**

## लाथा बुक्क्यांनी केली जबर मारहाण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** 48 वर्षीय इसमाला ठार मारण्याच्या उद्देशाने लाथा बुक्क्याने जबर मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी दोघांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात एक जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.अनिता कातकरी यांचे चुलत मामा सासरे हे योगेश कातकरी याच्या मुलाच्या मोटरसायकलला आडवे गेल्याने तो मोटारसायकल स्लिप होऊन पडला आणि त्याला दुखापत झाली. या गोष्टीचा राग मनात धरून योगेश कातकरी आणि गणेश कातकरी यांनी 31 मे रोजी 11 च्या सुमारास फिर्यादी यांचे चुलत मामा सासरे यांना तुला संपवून टाकतो असे बोलून जीवे ठार मारण्याचे उद्देशाने लाथाबुक्याने मारहाण केली आणि जोरात ढकलून दिले. त्यामुळे ते जमिनीवर पडून त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

## वेश्या व्यवसाय प्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** वीस वर्षीय मुलीला वेश्या व्यवसाय करण्यासाठी भाग पाडल्या प्रकरणी वरचा ओवळा येथील महिलेविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात एक जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.पनवेल तालुक्यातील वरचा ओवळा येथील आरोपी महिलेने वीस वर्षीय पीडित मुलीला प्रलोभन दाखवून वेश्याव्यवसाय करण्यासाठी भाग पाडले. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी त्या ठिकाणी बनावट ग्राहक पाठवला आणि आरोपीने बनावट ग्राहकाला पीडित मुलगी दाखवून अनैतिक शारीरिक संबंधासाठी 3 हजार रुपये स्वीकारले.

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात बसपाचा एल्गार; मुख्यमंत्र्यांना तहसीलदारांमार्फत निवेदन

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी :** अनुसूचित जाती प्रवर्गात उपवर्गीकरण (अ, ब, क, ड) करण्याच्या प्रस्तावाला तीव्र विरोध दर्शवत बहुजन समाज पक्षाने आज लाखनी तहसील कार्यालयावर धडक देत तहसीलदारांमार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना निवेदन सादर केले. यावेळी १४ मे २०२६ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयालाही बसपाने संविधानविरोधी ठरवत तो तात्काळ रद्द करण्याची मागणी केली.



बसपाच्या निवेदनात म्हटले आहे की, भारतीय संविधानाने अनुसूचित जातींना सामाजिक न्याय, समान प्रतिनिधित्व आणि विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आरक्षणाची तरतूद केली आहे. महाराष्ट्रातील अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट असलेल्या ५९ जातींमध्ये उपवर्गीकरण केल्यास समाजात फूट पडून सामाजिक ऐक्य धोक्यात येऊ शकते. यामुळे विविध घटकांमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने कोणत्याही परिस्थितीत उपवर्गीकरण लागू करू नये, अशी ठाम भूमिका पक्षाने घेतली आहे.

याशिवाय, १४ मे २०२६ रोजी मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय समाजातील गुणवंत उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील संधींपासून दूर ठेवले जात असल्याचा आरोपही बसपाने केला. खुला प्रवर्ग हा सर्व नागरिकांसाठी समान असावा आणि गुणवत्तेच्या आधारे प्रत्येकाला स्पर्धा करण्याचा अधिकार मिळाला पाहिजे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

बसपाने शासनाकडे अनुसूचित जाती प्रवर्गात उपवर्गीकरण न करण्याची, १४ मे २०२६ चा मंत्रिमंडळ निर्णय रद्द करण्याची तसेच एससी, एसटी व ओबीसी समाजातील गुणवंत उमेदवारांना खुल्या प्रवर्गात समान व न्याय्य संधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.निवेदन सादर करताना बसपाचे जिल्हा महासचिव चंद्रमणी गोंडाने, साकोली विधानसभा प्रभारी सोपान दिवटे, विधानसभा महासचिव महेंद्र गेडाम, विधानसभा सचिव राहुल कांबळे, तालुका प्रभारी चेतन कान्हेकर व हर्षदीप गणवीर, लाखनी तालुका अध्यक्ष केशव तिरपुडे, लाखांदूर तालुका अध्यक्ष चेतन बोरकर, महिला आघाडी अध्यक्षा उज्वला गणवीर, तालुका उपाध्यक्ष सचिन रामटेके यांच्यासह धीरज गोस्वामी, अमित रामटेके, नितीन मेश्राम, सुनील रामटेके, धनराज मेश्राम, कविराज गजभिये, शशिकांत रामटेके आणि डिगेश्वर रामटेके यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी भारतीय संविधानातील समानता, सामाजिक न्याय आणि बंधुतेच्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी केली. समाजात फूट पाडणारे निर्णय न घेता सर्व घटकांना न्याय देणारे धोरण स्वीकारावे, असे आवाहनही करण्यात आले."संविधान बचाव, सामाजिक न्यायाचा लढा सुरूच राहणार" असा निर्धार यावेळी बसपा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# नवीन पनवेल येथील विवाहित महिला बेपत्ता; खांदेश्वर पोलिसांकडून शोध सुरू

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** नवीन पनवेल परिसरातील २८ वर्षीय विवाहित महिला बेपत्ता झाल्याची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलिसांकडून तिचा शोध सुरू आहे.



खांदेश्वर पोलीस ठाण्यात मिसिंग क्रमांक ६१/२०२६ अन्वये दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, अनु विकारा राणे (वय २८ वर्षे) या राहणार घर क्रमांक ७५, भीमनगर झोपडपट्टी, विजय मार्ग, शबरी हॉटेलच्या मागे, सेक्टर १/एस, नवीन पनवेल येथील रहिवासी आहेत.

दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३.०० ते ३.३० वाजण्याच्या दरम्यान त्या आपल्या राहत्या घरातून कोणालाही काहीही न सांगता निघून गेल्या. कुटुंबीयांनी नातेवाईक व परिचितांकडे शोध घेतला, मात्र त्या अद्यापही मिळून आलेल्या नाहीत. याबाबत पती विकास विजय राणे यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

बेपत्ता महिलेचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे – उंची सुमारे ४ फूट ५ इंच, सावळा रंग, सडपातळ बांधा, गोल चेहरा, काळे डोळे, सरळ नाक व लांब काळे केस. अंगात लाल रंगाचा पंजाबी ड्रेस व पायात चप्पल होती. त्या मराठी व हिंदी भाषा बोलतात.

या प्रकरणी २ मे २०२६ रोजी रात्री ९.४४ वाजता मिसिंगची नोंद करण्यात आली असून पोलीस उपनिरीक्षक शरद पवार हे तपास करत आहेत.सदर महिलेबाबत कोणासही माहिती मिळाल्यास खांदेश्वर पोलीस ठाणे (मो. ९२८४११४६७१) किंवा वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे (मो. ९८२११६४०२९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी स्वीकारला सोयगाव पोलीस ठाण्याचा पदभार

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** सोयगाव पोलीस ठाण्याचे तत्कालीन प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांची बदली झाल्यानंतर नव्याने नियुक्त झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर शिवाजीराव गोरे यांनी सोमवार,दि.१ रोजी सोयगाव पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला.यावेळी मंगळवार, दि.२ रोजी निर्भय युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या



वतीने मराठवाडा अध्यक्ष विजय काळे यांनी सोयगाव पोलीस ठाण्यात जाऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांची भेट घेत त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार केला. या प्रसंगी सोयगाव शहरातील नगरसेवक रोफ काळू मामा, जरंडी येथील पत्रकार विजय चौधरी,लोकमत समाचारचे पत्रकार शेख सुलेमान,प्रवीण परेराव यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,पोलीस कर्मचारी संदीप सुसर, राजू सोनवणे, गजानन दांडगे, सादिक तडवी,बाम्हणदे, समाधान बारी आदी उपस्थित होते.

नवीन प्रभारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच नागरिकांना अधिक चांगली पोलीस सेवा देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.

## लोकांच्या जीवाशी सुरू असलेला खेळ थांबवावा; श्री वेंकटेश्वर प्रतिष्ठानची उपजिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**सेलू , प्रतिनिधी शिवाजी पवार:** सेलू शहरात आंबे व इतर फळे कॅल्शियम कार्बाईडसह विविध घातक रसायनांच्या साहाय्याने कृत्रिमरीत्या पिकवली जात असल्याचा आरोप करत, संबंधितांवर तातडीने कारवाई करावी व लोकांच्या जीवाशी सुरू असलेला हा खेळ थांबवावा, अशी मागणी श्री वेंकटेश्वर प्रतिष्ठानच्या वतीने उपजिल्हाधिकारी, सेलू यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.



उपजिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरात काही व्यापाऱ्यांकडून आंबे व इतर फळे कॅल्शियम कार्बाईड आणि इतर घातक रसायनांचा वापर करून पिकवली जात आहेत. अशा रसायनांचा वापर करून पिकवलेल्या फळांच्या सेवनामुळे तोंड येणे, उलट्या होणे, जुलाब, पोटदुखी यांसारखे त्रास उद्भवू शकतात. तसेच कर्करोगासारख्या गंभीर आजारांचाही धोका निर्माण होऊ शकतो. आर्थिक फायद्यासाठी नागरिकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

भारतीय अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांनुसार कॅल्शियम कार्बाईडचा वापर करून फळे पिकवणे बेकायदेशीर असून तो दंडनीय गुन्हा आहे. असे असतानाही काही ठिकाणी सर्रासपणे या रसायनाचा वापर होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकाराची तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी व नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेला हा खेळ थांबवावा, अन्यथा श्री वेंकटेश्वर प्रतिष्ठानच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.यावेळी जयसिंग शेळके, अनुप कान्हेकर, विनोद धापसे, गणेश शेवाळे, रवि लांडगे, संदीप पाजगे, सागर गायकवाड आदी उपस्थित होते.

# ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी कै. डॉ. शान्ती पटेल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ पारितोषिक ठेव प्रमाणपत्र सुपूर्द; उरण येथे समारंभ उत्साहात!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, माजी कामगार विश्वस्त कै. डॉ. शान्ती पटेल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ "ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी माजी कामगार विश्वस्त कै. डॉ. शान्ती पटेल स्मृती पारितोषिक" देण्यासाठी शाळांच्या वार्षिक पारितोषिक ठेव प्रमाणपत्र सुपूर्द समारंभ दि. २३ मे २०२६ रोजी दुपारी ३.३० वा. तेरापंथ भवन, वाणी आळी, उरण येथे संपन्न झाला.

तद्प्रसंगी उरण एज्युकेशन सोसायटी व जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे पारितोषिक ठेव प्रमाणपत्र श्री नितीन माळी यांनी डॉ. यतिन पटेल यांच्याकडे सुपूर्द केले. सदर प्रसंगी डॉ. यतिन पटेल यांनी प्रशंसोद्गार काढले. "हा उपक्रम स्तुत्य असून अनेकांना यातून प्रेरणा मिळेल व शालेय विद्यार्थ्यांना नवीन ऊर्जा प्राप्त होईल," असेही त्यांनी नमूद केले.



जवाहरलाल नेहरू बंदरातील ज्या सेवानिवृत्त व कार्यरत कामगारांनी डॉ. शान्ती पटेल यांच्या नावाने उरण मधील दोन शाळेतील वेगवेगळ्या विषयांमध्ये प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यासाठी देणगी जमा करून खारीचा वाटा उचलला आहे, त्यांचे तसेच ज्या शाळांनी ह्या उपक्रमास मान्यता दिली त्या संचालक मंडळाचेही श्री आर. एस. देसाई यांनी आभार मानले. तुकाराम कडू यांनी डॉ. शान्ती पटेल यांच्या विश्वस्तपदाच्या कार्यकाळातील कार्याचा उजाळा दिला. प्रकल्पग्रस्तांसाठी १२.५ टक्के जमीन, प्रकल्पग्रस्तांच्या मुलांसाठी शाळेत मोफत प्रवेश व शिक्षणात सवलत, विभागातील ग्रामपंचायतीचा कर, कंत्राटी कामगारांना पगारवाढ इत्यादी महत्त्वपूर्ण कार्यांचा त्यांनी उल्लेख केला.विलास गोरेगावकर यांनी जेएनपीएमध्ये कामाला लागण्याआधीची डॉ. शान्ती पटेल यांची ग्रंथालयासंबंधीची आठवण सांगितली. तर श्री सुनिल जोशी यांनी हे कार्य अधिक जोमाने पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. श्री कुमारअक्षय कराळे यांनी पद्यपंक्ती सादर केल्या . डॉ. शान्ती पटेल यांच्या कामगार चळवळ व सामाजिक विषयाच्या अनुषंगाने खूप जवळचे संबंध आलेल्या जेएनपीएच्या कामगार, कामगार संघटना तसेच इतर सामाजिक संस्थांचे प्रतिनिधीही यावेळी उपस्थित होते.

# मुदखेड तहसील कार्यालयावर काँग्रेसचा गाढव मोर्चा; शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आक्रोश

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : प्रकाश गवारे मुदखेड :** नुकत्याच झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे नांदेड जिल्ह्यासह मुदखेड तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र प्रशासनाने या नुकसानीची योग्य दखल घेतली नसल्याचा आरोप करत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने मुदखेड तहसील कार्यालयावर गाढव मोर्चा काढण्यात आला. राष्ट्रीय कोंग्रेस पक्षाचे लोकप्रिय खासदार रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व बालाजी गाढे यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आलेल्या या आक्रोश मोर्चात हजारो शेतकरी सहभागी झाले होते. शेतकऱ्यांना तातडीने पीकविमा मिळावा, शेतीपंपांसाठी १२ तास त्रिफेज वीजपुरवठा सुरू करावा, खतांच्या वाढत्या किमती नियंत्रणात आणाव्यात तसेच शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर



सरकारने तत्काळ निर्णय घ्यावा, या प्रमुख मागण्या मोर्चाद्वारे करण्यात आल्या.

यावेळी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महायुती सरकारवर टीका करत शेतकऱ्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. सरकारने शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यावर प्रभावी उपाययोजना कराव्यात, आस वक्तव्य आंदोलनकर्त्यांनी केलं मोर्चादरम्यान गाढवांचा प्रतीकात्मक वापर करून सरकारच्या भूमिकेचा निषेध करण्यात आला. "शासनाने गाढवासारखे वागू नका" म्हणजे गाढवाच्या पाठीवर ब्यानर लावण्यात आले होते असा संदेश देत आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.या मोर्चात काँग्रेस पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच तालुक्यातील विविध गावांतील शेतकरी बांधव हजारोच्या संख्येने उपस्थित होते. आंदोलकांनी तहसील प्रशासनाला आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

# समाजभूषण पुरस्कार २०२६ ने श्री खंडुआण्णा भरत गव्हाणे यांचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय :** डिंग्रजवाडी, कोरेगाव भीमा (ता.शिरूर,जि. पुणे) येथील यशोदा माहिती अधिकार प्रशिक्षण संस्था, पुणेचे संस्थापक अध्यक्ष श्री खंडुआण्णा भरत गव्हाणे यांना सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक, धार्मिक व जनहिताच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल"समाजभूषण पुरस्कार २०२६"या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

माणूस परिवार महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष श्री दुष्यंतराजे जगताप यांच्या नियोजनातून २ जून २०२६ रोजी पुणे येथील न्यू इंग्लिश स्कूल,टिळक रोड येथील सभागृहात आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.पुणे बार असोसिएशनचे सदस्य श्री सूर्यकांत नाळे यांच्या हस्ते श्री गव्हाणे यांना सन्मानचिन्ह,ट्रॉफी,प्रमाणपत्र व नियुक्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमास शैक्षणिक,सामाजिक,औद्योगिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री खंडुआण्णा भरत गव्हाणे म्हणाले की,"उत्तम चारित्र्य,ज्ञान,वेळेचे व्यवस्थापन,




सत्कर्म, सहकार्य,प्रामाणिकता,समाजकार्य आणि समुपदेशन या गुणांचे जतन करणारी व्यक्तीच समाजात प्रतिष्ठेस पात्र ठरते."

गेल्या १० ते १५ वर्षांपासून श्री गव्हाणे यांनी माहिती अधिकार, लोकसेवा हक्क, अभिलेख हक्क, रुग्ण हक्क, भ्रष्टाचारविरोधी जनजागृती, घनकचरा व्यवस्थापन, वृक्षसंवर्धन, रक्तदान, अतिक्रमणविरोधी मोहिमा, महिला व बालक संरक्षण, समुपदेशन तसेच विविध कायद्यांविषयी जनजागृती यांसारख्या अनेक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे.पद्मविभूषण ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली यशोदा माहिती अधिकार प्रशिक्षण संस्था कार्यरत असून संस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक, कायदेविषयक व जनजागृतीपर शिबिरांचे आयोजन केले जाते. संस्थेच्या कार्यात अनेक समाजसेवक, कायदेतज्ज्ञ, शासकीय अधिकारी, कर्मचारी, पत्रकार व कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभत आहे.

यापूर्वीही श्री गव्हाणे व यशोदा संस्थेला विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार केवळ वैयक्तिक नसून संस्थेच्या सर्व सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते व सहकाऱ्यांच्या सामूहिक कार्याची पावती असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

समाजभूषण पुरस्कार २०२६ जाहीर झाल्यानंतर श्री खंडुआण्णा भरत गव्हाणे व यशोदा माहिती अधिकार प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# उरणच्या ८ खेळाडूंची गरुडझेप; महाराष्ट्र आईस हॉकी संघात निवड!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** औद्योगिक आणि किनारी भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उरण तालुक्याच्या क्रीडा इतिहासात एक सुवर्णपान जोडले गेले आहे. उरणमधील तब्बल आठ खेळाडूंनी महाराष्ट्र आईस हॉकी संघात स्थान मिळवून तालुक्याचा नावलौकिक वाढवला आहे. असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी या खेळाडूंची निवड झाली असून, ते उत्तराखंडमधील देहरादून येथे महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

आईस हॉकीसारख्या प्रामुख्याने हिमालयीन प्रदेशात खेळल्या जाणाऱ्या आणि विशेष कौशल्याची गरज असणाऱ्या खेळात उरणसारख्या किनारपट्टीच्या भागातून खेळाडू तयार होणे ही अत्यंत उल्लेखनीय आणि कौतुकास्पद बाब मानली जात आहे.

१२ वर्षांखालील गट: वरदा आसरकर, शिवांश तांडेल १५ वर्षांखालील गट: अर्थ सावंत, रुद्र घरत, रेवा पाटील.

१८ वर्षांखालील गट: सुरज करण.सीनियर गर्ल्स गट: स्नेहा शेळके, शर्वणी.

या खेळाडूंच्या यशामागे 'श्री स्केटिंग अर्कॅडमी'चे संस्थापक व प्रशिक्षक प्रीती पाटील आणि राकेश पाटील यांचे मोलाचे योगदान



आहे. त्यांनी घेतलेले अपार परिश्रम, सातत्यपूर्ण तांत्रिक मार्गदर्शन आणि खेळाडूंमध्ये निर्माण केलेली जिद्द यामुळेच उरणच्या खेळाडूंनी ही गरुडझेप घेतली आहे. बर्फावर खेळल्या जाणाऱ्या या अत्यंत वेगवान आणि रोमांचक खेळात शारीरिक तंदुरुस्ती, विवेक संतुलन आणि चपळ निर्णयक्षमतेची गरज असते. महाराष्ट्रात स्केटिंगच्या माध्यमातून या खेळाचा प्रसार वेगाने वाढत आहे.

या सर्व खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधी प्रतिनिधित्व करताना उत्कृष्ट कामगिरी करावी आणि उरणच्या क्रीडा इतिहासात मानाचा तुरावा अशी अपेक्षा आणि विश्वस्ताने क्रीडाप्रेमींकडून व्यक्त केला जात आहे .सद्यस्थितीत सर्व खेळांवर खेळाडूंवर क्रीडा क्षेत्रात सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कृषी विभागाची धडक कारवाई, ७ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द, ३ निलंबित !!

**दैनिक युवक आधार**

**अकोला दिलीप कराळे/प्रतिनिधी** : खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी कृषी विभागाने जिल्ह्यात कृषि निविष्ठा विक्रीत अनियमितता आढळल्याने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मोठी कार्यवाही केली असून तपासणी आणि सुनावणीअंती ७ कृषी सेवा केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत.

त्याचप्रमाणे, ३ केंद्रांचे परवाने १ ते २ महिन्याकरिता निलंबित करण्यात आले आहेत. तर इतर ६ केंद्रांना त्रुटीं बाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे. या कारवाईमुळे नियमबाह्य व्यवसाय करणाऱ्या केंद्रचालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

तपासणी व सुनावणी दरम्यान समाधानकारक खुलासा, स्पष्टीकरण न देऊ शकल्याने ही कारवाई करण्यात आली.

कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) तालुका कृषि अधिकारी कार्यालय व



कृषी अधिकारी, पंचायत समिती यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील विविध कृषी केंद्रांची अचानक तपासणी केली होती. या मोहिमेत एकूण १६ कृषी केंद्रांमध्ये गंभीर व नियमबाह्य बाबी आढळून आल्या. 'इ-पॉस' (e-PoS) मशीनमधील अधिकृत साठा आणि प्रत्यक्ष दुकानात उपलब्ध असलेला साठा यात मोठी तफावत आढळली. दुकानात साठा फलक आणि चालू दर फलक अद्ययावत ठेवले नव्हते. तसेच, शेतकऱ्यांना अधिकृत 'पक्की बिले' न देणे किंवा दिलेली बिले विहित नमुन्यात नसणे, केंद्राचे अधिकृत परवाना/ नोंदणी प्रमाणपत्र ग्राहकांना दिसेल अशा ठिकाणी न लावणे या त्रुटींच्या अनुषंगाने जिल्हा स्तरावर घेण्यात आलेल्या सुनावणीत उचित खुलासा उत्तर न मिळाल्याने ही कडक कारवाई करण्यात आली.

**खरीप हंगामात बियाणे, खते किंवा कीटकनाशकांची विक्री करताना कोणत्याही प्रकारचा काळाबाजार, साठेबाजी किंवा बळजबरीने उत्पादनांची लिंकिंग (एका वस्तूसोबत दुसरी वस्तू घेण्याची सक्ती) खपवून घेतली जाणार नाही. शेतकऱ्यांची आर्थिक लुबाडणूक करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. ज्या केंद्रांवर अनियमितता आढळली, त्यांच्यावर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे. आगामी काळातही ही तपासणी मोहीम अधिक तीव्र केली जाईल आणि दोषींवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील.**

**— जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे**

कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात खरीप हंगामासाठी पुरेसा खत आणि बियाणे साठा उपलब्ध आहे. मात्र, फसवणूक टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी खरेदी करताना खालील गोष्टींची काळजी घ्यावी.

पक्के बिल घ्याः खरेदी केल्यानंतर विक्रेत्याकडून विहित नमुन्यातील पक्के बिल आवर्जून मागावे.

नोंद तपासाः बिलावर लॉट नंबर, बॅच नंबर आणि योग्य किंमत लिहिलेली आहे का, याची शहानिशा करा.

ब्रँडला प्राधान्यः नेहमी नामांकित आणि नोंदणीकृत कंपन्यांच्याच कृषी निविष्ठांना प्राधान्य द्यावे.

तक्रार कोठे करावी?

जर कोणत्याही कृषी केंद्रचालकाने बियाणे किंवा खतांचा काळाबाजार केला, जादा दराने विक्री केली किंवा पक्के बिल देण्यास नकार दिला, ]

तर शेतकऱ्यांनी त्वरित आपल्या तालुक्यातील पंचायत समिती किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील 'तक्रार निवारण कक्षात' संपर्क साधावा, लेखी तक्रार करावी असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

# सय्यद अकबर यांची भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा कोकण विभाग सहसंयोजक पदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : भारतीय जनता पार्टीच्या अल्पसंख्यांक मोर्चाच्या माध्यमातून जनसंपर्क, जनसेवेचे कार्य करणाऱ्या पनवेल येथील सय्यद अकबर यांच्या सक्षम खांद्यावर पक्ष नेतृत्वाने अल्पसंख्यांक मोर्चाच्या कोकण विभाग सहसंयोजक म्हणून जबाबदारी दिली आहे. येत्या ५ जून ते ३० जून दरम्यान होणाऱ्या विविध मंडळ स्तरीय कार्यक्रमांची काटेकोर नियोजन यंत्रणा उभारणे आणि त्या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्याच्या अनुषंगाने सय्यद अकबर यांची नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. पक्ष संघटन, निवडणुका नियोजन आणि योजना अमंलबजावणी यांचा प्रचंड दांडगा अनुभव असणाऱ्या सय्यद अकबर यांची अल्पसंख्यांक मोर्चाच्या कोकण विभाग सहसंयोजक पदी नियुक्ती झाल्याने कार्यकर्त्यांच्यात आनंदाचे वातावरण पाहायला मिळते.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने आगामी सुमारे महिन्याभराच्या कालावधीमध्ये जनसंपर्क, स्वास्थ्य संवर्धन आणि पर्यावरण रक्षण या तीन महत्त्वपूर्ण आघाड्यांवर जनता केंद्रित कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या



कार्यक्रमांची आखणी, छोट्यातल्या छोट्या गोष्टीचे नियोजन आणि प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या दिवशी सुरळीत आयोजन करणे याकामी मंडळ स्तरावर सक्षम शिलेदार निवडण्याची जबाबदारी देखील सय्यद अकबर यांच्यावर पक्ष नेतृत्वाने सोपविलेली आहे. भाजपच्या वतीने पाच जून रोजी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यामध्ये वृक्षारोपण अभियान, तसेच "एक पेड माँ के नाम" अभियान, देशाला अत्यंत गरज असणारी अशी इंधन बचतीचा संदेश देण्यासाठी सायकल व दुचाकी रॅली, स्वच्छता तसेच प्लास्टिक मुक्त अभियान, जलसंरक्षण जागरूकता अभियान, वृक्ष वाटप, प्रसिद्धी माध्यमांशी संवाद आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या लोकाभिमुख कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी आणि युवा वर्गाला सहभागी करून घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

यंदाचे वर्षी कोकण प्रांतामध्ये योग दिवस आयोजित करून त्याचे अनुषंगाने जनसंपर्क वाढवण्याचे कार्य सय्यद अकबर यांच्या मार्गदर्शनाखाली हाती घेण्यात आले आहे. या नियुक्ती बाबत विचारले असता सय्यद अकबर म्हणाले की हे पद म्हणजे मी करत असलेल्या निस्सिम कार्याची पावती आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला गुरुमंत्र म्हणजे सबका साथ! सबका विकास! हा गुरुमंत्र मी माझ्या हृदयावर आणि मेंदू मध्ये कोरला आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर,कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर आणि अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुल्तानी यांच्या उत्तम मार्गदर्शनाखाली मी नेहमीच कार्यरत असतो तसाच यापुढे देखील असेन.आगामी काळातील जनता केंद्रित कार्यक्रम मी समाजातील अखेरच्या घटकापर्यंत घेऊन जाईन असा विश्वास व्यक्त केला.

# उभरते सितारे मध्ये 'सांस्कृतिक वारसा'

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपुर :** मुले पाहूनच शिकतात. तुमची मुले तुम्हाला पाहत असतात की, तुम्ही तुमचे जीवन कसे जगत आहात. मानसशास्त्राच्या भाषेत याला रोल मॉडेलिंग असे म्हणतात. आज सर्व पालक मोबाईलमध्ये व्यस्त असतात. जर आपण स्वतःचा फोन बाजूला ठेवला तर, मुलेही मोबाईल कमी पाहतील. तुम्ही जे कराल, तेच मूल करेल. तुमचे मूल हे तुमचे प्रतिबिंब आहे. जेव्हा आपण आपल्या जीवनात सजग राहू, आपल्या वाणीमध्ये गोडवा असेल, आपल्या वर्तनात जागरूकता आणि स्थिरता असेल, तेव्हा आपली मुलेही तेच शिकतील. आपल्या घरातील वातावरण योग्य असणे आवश्यक आहे. मुलांना बाहेर मैदानात नेऊन नैसर्गिक खेळ खेळणे गरजेचे आहे. हे विचार हरमीत कौर लांबा यांनी मुलांमध्ये आणि त्यांच्या पालकांमध्ये व्यक्त केले.



विदर्भ हिंदी साहित्य सम्मेलन च्या नवोदित प्रतिभांना समर्पित उपक्रम 'उभरते सितारे' चे आयोजन हिंदी मोर भवन येथील उत्कर्ष हॉलमध्ये करण्यात आले. कार्यक्रमाचा विषय 'सांस्कृतिक वारसा' यावर आधारित शैक्षणिक, ज्ञानवर्धक आणि संगीतमय सादरीकरणांनी भरलेला होता. कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून क्लिनिकल सायकोलॉजिस्ट आणि काउंसलर हरमीत कौर लांबा उपस्थित होत्या. त्यांचा सन्मान संयोजक युवराज चौधरी आणि सहसंयोजिका वैशाली मदारे यांनी स्वागत वस्त्र व स्मृतिचिन्ह देऊन केला.

त्यानंतर सर्व मुलांनीही 'सांस्कृतिक वारसा' या विषयावर सुंदर विचार मांडत उत्कृष्ट नृत्य आणि गीतांचे सादरीकरण केले. यामध्ये, संपूर्णा रेमंडल, पर्व डान्स अर्कॅडमीची सानवी डाहाके, सारेगामा डान्स अँड म्युझिक अर्कॅडमीची श्रुही भालेराव, अव्यम आंबेकर, नैक्स मेश्राम, शरण्या नितनवरे, जसविका शेंडे, अथर्व गजभिए, ईताष घरडे, केतकी डोंगरे, दिव्या कडसाईत, कोमल पांडे, कनक भैसारे, कृतिका मेघवानी, रिदान नंदा आदींनी अप्रतिम नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली. श्री बागल, विधी कृपलानी, आदित मिंज, अलीशा खोबरागडे, त्रिशिका वाघमारे, जान्हवी तामगडे, भव्या अरोरा, आरोही पोपलवार, नैक्स मेश्राम, राम बागल आणि सुतिक्ष रामटेके यांनी आपल्या गीतांनी सर्वांना प्रभावित केले. सारेगामा डान्स अँड म्युझिक अर्कॅडमीच्या मुलांनी सामूहिक गीत सादर केले.

मुलांच्या सादरीकरणाचे त्यांच्या पालकांसह जयश्री राहाटे, राशी नितनवरे, सुधा मेश्राम, अथक भैसारे, मोनिका रेमंडल, गीता सुरेश मिंज, जवाहर तरार, सीमा लूहा, शिवानी लूहा, स्नेहा सूरज रामटेके, हीर दीपक कृपलानी, प्रीती बागल, वेदप्रकाश अरोरा, सीमा पांडे आणि डॉ. हर्षानंद पोपलवार आदींनी भरभरून कौतुक केले. कार्यक्रमाचे कुशल सूत्रसंचालन सहसंयोजिका वैशाली मदारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रशांत शंभरकर यांनी सहकार्य केले. तसेच उपस्थित सर्व प्रेक्षक, कलाकार आणि मुलांचे आभार संयोजक युवराज चौधरी यांनी मानले.

# विद्यापीठ विद्यार्थ्यांचा विजय :भाजयुमो

## अनेक प्रश्नांचे कुलगुरूंनी केले समाधान ;उरलेल्या मागण्यांचे पुढील सत्रात निराकरण करण्याचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित समस्या आणि मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चा आणि विद्यार्थी आघाडीतर्फे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. या अनुषंगाने, भाजप शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या सूचनेनुसार आज दिनांक ३ जून २०२६ रोजी युवा मोर्चाच्या शिष्टमंडळाने माननीय कुलगुरु मॅडम यांनी दिलेल्या पूर्वनियोजित वेळेनुसार विद्यापीठाच्या कुलगुरूंची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.या भेटीदरम्यान, युवा मोर्चाने सादर केलेल्या २० प्रमुख मागण्यांवर विद्यापीठ प्रशासनाने सविस्तर चर्चा करून सकारात्मक भूमिका घेतली आहे.चर्चेत उपस्थित करण्यात आलेल्या बऱ्याच प्रमुख व तातडीच्या असलेल्या समस्या विद्यापीठ प्रशासनाने तातडीने सोडवल्या असून तसे लिखित उत्तर व खुलासा सुद्धा विद्यापीठाने केला असून,उर्वरित समस्या देखील लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन मा. कुलगुरू महोदयांनी दिले आहे. पुढील परीक्षा प्रक्रिया व्यवस्थित करून विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही व झालंच तर लगेच निपटारा करण्याच्या दृष्टीने व्यवस्था लावण्यात येईल असे सांगण्यात आले. चर्चा करताना प्रमुखपणे परीक्षा केंद्रावर कुलर व थंड पाण्याची व्यवस्था करावी



या समस्येवर कुलगुरु मॅडम यांनी ४ मे व २२ मे ला काढलेल्या पत्रका अन्वये सर्व महाविद्यालयांना सूचना दिले असल्याचे व सोबत लागणाऱ्या खर्चाची व्यवस्था सुद्धा केल्याचे सांगितले तसेच कुलगुरू मॅडम यांनी व्यक्तिशः अनेक परीक्षा केंद्रांवर जाऊन पाहणी सुद्धा करीत असल्याचे सांगितले,परीक्षा वेळापत्रक 30 दिवस आधी व प्रवेश पत्रक निदान 7 दिवस आधी द्यावे या प्रश्नावर सद्यास्थितीत सर्व परीक्षांचे वेळापत्रके घोषित करण्यात आलेले असल्याचे परंतु काही महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र वेळेत सादर न केल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून त्या विद्यार्थ्यांचे वेळेवर परीक्षा आवेदनपत्र स्विकारुन त्यांना वेळेवर प्रवेशपत्र देण्यात आल्याचे सांगितले.विथहेल्ड निकाल समस्या दूर करणे व टी आर बुक महाविद्यालयात लवकर उपलब्ध करून देणे या प्रश्नावर उन्हाळी २०२६ परीक्षेपासुन संबंधित परीक्षेचे पीडीएफ टी. आर. प्रत पाठविण्यात येणार असल्याचे सांगितले. प्रवेशपत्रावरील रोल नंबर व निकालातील तांत्रिक त्रुटी,दुरवरच्या विद्यार्थ्यांसाठी नागपुरात स्थायी विद्यार्थी मदत केंद्र उभारणे,पुनर्मुल्यांकनाचे निकाल वेळेत लावणे,अंतर्गत गुणांची जबाबदारी निश्चित करणे,कर्मचा-यांचे विद्यार्थ्यांप्रति अयोग्य वर्तन करीता त्यांचे प्रशिक्षण,उत्तरपत्रिका मुल्यमापनाची नियमावली व शिक्षकांचे मुल्यांकन,पीएचडी. विद्यार्थ्यांच्या प्रोग्रेस रिपोर्टची मुदत,पर्यवेक्षक व मुल्यमापन मानधनात वाढ करणे,तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्त्या वेळेत करणे,स्वायत्त विभागांचे निकाल वेळेत लावणे,केंद्रीय प्रवेश प्रक्रिया,मूलभूत सोयी सुविधा (स्वच्छतागृहे व पिण्याचे पाणी),कंत्राटी प्राध्यापकांना विमा कवच देणे,कुलगुरुंचा जिल्हा दौरा व विद्यार्थी संवाद,प्रशासकीय, शैक्षणिक कामकाज जास्ती जास्त ऑनलाईन करणे इत्यादी प्रश्नांवर सकारात्मक उत्तर देऊन विद्यार्थी हिताचे निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले.याबाबत भूमिका स्पष्ट करताना युवा मोर्चाच्या प्रतिनिधींनी सांगितले की,"विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न विद्यापीठासमोर प्रभावीपणे मांडण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत.बरेच प्रश्न सुटलेले आहेत व बाकी असलेल्या समस्यावर येत्या काळात पाठपुरावा सुरू राहील,युवा मोर्चाच्या माध्यमातून विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या व युवकांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून, याआधीही अनेक प्रश्न मार्गी लावण्यात आम्हाला यश आले आहे.भविष्यातही युवा आणि विद्यार्थ्यांच्या पाठीशी युवा मोर्चा खंबीरपणे उभा राहील"यावेळी शिष्टमंडळात युवा मोर्चा अध्यक्ष सचिन करारे,महामंत्री रितेश पांडे,रिषभ अरखेल,अथर्व त्रिवेदी,विद्यार्थी आघाडी प्रमुख शंतनू झाडे,युवती प्रमुख प्रशंसा भोयर व वैभव बावनकर उपस्थित होते. या भेटीमुळे व समस्या निराकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून,विद्यापीठाच्या सकारात्मक भूमिकेमुळे विद्यार्थ्यांच्या अनेक अडचणी सुटण्यास मदत होणार आहे.

## सिल्लोडमध्ये खत-बियाण्यांची चढ्या दराने विक्री

# शेतकऱ्यांची लूट ; शिवसेना ( ठाकरे गट ) कडून उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील काही कृषी सेवा केंद्र चालकांकडून खते व बियाण्यांची शासनाने निर्धारित केलेल्या किमतीपेक्षा वाढीव दराने विक्री करून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी तातडीने चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी डॉ. निलेश अपार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, सध्या पेरणीचा हंगाम तोंडावर असताना कृषी सेवा केंद्र चालक जाणीवपूर्वक खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करत आहेत. शेतकऱ्यांना खत हवे असल्यास त्यासोबत इतर



अनावश्यक उत्पादने घेण्याची सक्ती केली जात आहे. अनेक केंद्रांवर पक्की जीएसटी बिले न देता केवळ कच्च्या पावत्यांवर व्यवहार होत आहेत. कृषी विभागाचे या प्रकारांकडे दुर्लक्ष असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे. सदर प्रकार खत नियंत्रण आदेश, बियाणे नियंत्रण नियम तसेच ग्राहक संरक्षण नियमांचे थेट उल्लंघन करणारा आहे.त्यामुळे प्रशासनाने संबंधित कृषी सेवा केंद्रांची तातडीने तपासणी करावी, खत -बियाण्यांच्या साठ्याची पडताळणी करावी, वाढीव दराने विक्री करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी आणि युरियासोबत इतर खतांची सक्ती करणाऱ्या विक्रेत्यांचे परवाने निलंबित किंवा रद्द करावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदन देतेवेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तालुकाप्रमुख रघुनाथ घरमोडे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी तालुकाध्यक्ष अजित पाटील, विधानसभा संघटक रघुनाथ चव्हाण, शिवसेना नेते संजय कळात्रे, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश वराडे, प्रसिद्धीप्रमुख दशरथ सुरडकर, शहरप्रमुख मच्छिंद्र धाडगे, उपशहर प्रमुख किशोर लोखंडे, शेख शाकेर, सुरेश थोरात, शिवा गौर, अमोल शिंदे, पंकज कांबळे, शेख अखिल शेख बाबू, सुधाकर सोनवणे, समाधान भोटकर, अरुण पाटील, सोहेल मिर्झा, भगवान खळतकर आदी पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्जमाफी की शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ?

## अस्मानी-सुलतानी संकटात भरडलेल्या शेतकऱ्यांसाठी तुटपुंजी मदत म्हणजे थट्टाच!

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे** :महाराष्ट्र शासनाने नुकताच "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026" चा शासन निर्णय जाहीर करून पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा केली आहे. शासनाचा हा निर्णय स्वागतार्ह असला तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या आयुष्यावर रोज कोसळणाऱ्या संकटांच्या पार्श्वभूमीवर ही मदत पुरेशी आहे का, असा सवाल आता ग्रामीण भागातून उपस्थित होत आहे.

शेतकरी पीक घेतो, तेव्हा सुरुवातीपासूनच त्याचा संघर्ष सुरू होतो. शेतीची मशागत, बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, फवारणी, मजुरी आणि सिंचन यांचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. शेतात काम करण्यासाठी मजूर मिळत नाहीत, मिळालेच तर त्यांची मजुरी परवडणारी राहिलेली नाही. त्यानंतरही शेतकरी आशेने पीक उभे करतो.

मात्र पीक काढणीच्या वेळी बाजारात वेगळेच वास्तव समोर येते. व्यापारी संगनमताने भाव पाडतात, शेतकऱ्यांचा माल कवडीमोल दरात विकत घेतात. त्यातून अडत, दलाली, हमाली, वाहतूक खर्च आणि इतर कपाती केल्यानंतर शेतकऱ्याच्या हातात काहीच राहत नाही. उत्पादन



खर्च आणि मिळालेला भाव यांचा ताळमेळ बसत नाही.

यावरही संकटे थांबत नाहीत. कधी अतिवृष्टी, कधी अल्पवृष्टी, कधी गारपीट तर कधी रोगराईमुळे उभे पीक उद्‌ध्वस्त होते. जंगली डुक्कर, निलगाय आणि इतर वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे हातातोंडाशी आलेले पीक एका रात्रीत नष्ट होते. या नुकसानीची भरपाई अनेकदा कागदावरच राहते.

अशा परिस्थितीत शेतकरी बँकेचे कर्ज फेडणार तरी कसे? कर्जमाफी ही मूळ प्रश्नांवरील उपाययोजना नसून

**"शासनाने जाहीर केलेली कर्जमाफी ही शेतकऱ्यांच्या जखमेवर लावलेली तात्पुरती मलमपट्टी आहे. उत्पादन खर्च प्रचंड वाढला असताना आणि शेतमालाला हमीभाव मिळत नसताना केवळ मर्यादित कर्जमाफीने शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. बियाणे,रासायनिक खते, कीटकनाशकांचा भाव गगनाला पोहचले, अतिवृष्टी, दुष्काळ, जंगली प्राण्यांचा उपद्रव आणि बाजारातील व्यापाऱ्यांची मनमानी यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडला आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफीपेक्षा त्यांच्या मालाला हमीभाव, उत्पादन खर्चावर आधारित योग्य दर आणि शेतीसाठी शाश्वत धोरणांची गरज आहे. अन्यथा अशा घोषणा म्हणजे शेतकऱ्यांच्या वेदनांची थट्टाच ठरेल."**

केवळ तात्पुरता दिलासा आहे. शेतकऱ्याला त्याच्या मालाला हमीभाव, उत्पादन खर्चावर आधारित योग्य किंमत, वन्यप्राण्यांपासून संरक्षण, स्वस्त खते-औषधे आणि शेतीला शाश्वत आधार देणारी धोरणे हवी आहेत.

आज प्रश्न असा आहे की, वर्षानुवर्षे अस्मानी आणि सुलतानी संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्याला केवळ तुटपुंजी मदत देऊन शासन आपली जबाबदारी संपली असे समजते का? लाखो रुपयांचा तोटा सहन करणाऱ्या शेतकऱ्याला काही हजार किंवा मर्यादित कर्जमाफी देणे म्हणजे त्याच्या वेदनांची थट्टा नव्हे का?

शेतकरी केवळ कर्जमाफी मागत नाही; तो त्याच्या कष्टाला न्याय मागत आहे.

राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या अन्नदात्याला दयेची नव्हे, तर सन्मानाने जगण्याची हमी देणाऱ्या धोरणांची गरज आहे. अन्यथा कर्जमाफीच्या घोषणा होत राहतील आणि शेतकरी मात्र संकटांच्या गर्तेतच अडकून राहील.

# माती,खत व वाळू शिवाय घरगूती पध्दतीने तयार करा नारळाची रोपे

**दैनिक युवक आधार**

**रिसोड तालुका प्रतिनिधी रणजितसिह ठाकूर** : सद्धस्थितीतील वाढते तापमान आणि जीवघेणी गरमी हे चंगळवादी लोकांनी निर्माण केलेली असंतूलीत पर्यावरणाची अनौरस अपत्ये आहेत.सध्दा ग्रीष्म ऋतू चालू आहे. या घडीला निसर्गामध्ये अनेक फळांच्या बीया उपलब्ध होतात.त्यांचे संकलन करून चालू असलेल्या जून महिन्यामध्ये त्यांची रोपटे तयार करून जूलै महिन्यामध्ये "वनमहोत्सवांतर्गत" त्यांची लागवड करावी जेणेकरून भविष्यामध्ये वाढत्या तापमानाचा चढता आलेख उतरविण्यास मदत होईल,अशी विनंतीवजा सूचना वृक्षमित्र गजानन मुलंगे ह्यांनी घरगूती पध्दतीने तयार केलेल्या नारळ रोपांच्या संदर्भात केली. माती,खत,तसेचं वाळू शिवाय निर्माण करण्यात आलेल्या



नारळाच्या रोपांचे समीक्षण करण्याकरीता अरविंद ईढोळे रेंजर फॉरेस्ट ऑफिसर ,तंत्रस्नेही अक्षय आडे सामाजिक वनीकरण विभाग वाशिम परिक्षेत्र रिसोड,गजानन कोरडे पोलीस पाटिल रिसोड,शरद टेमधरे प्राचार्य श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महा.रिसोड प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन गजानन मुलंगे ह्यांनी राहत्या घरी केले. तयार केलेल्या नारळी रोपांचे मार्गदर्शन करतांना मुलंगे म्हणाले कि,सदर्हु रोपांच्या निर्मितीकरिता पावसाळा ऋतू अनुकूल असतो. पाण्याने परिपुर्ण डबडबलेले व वाळलेले नारळ घेऊन सर्वप्रथम त्याच्या 80% काथ्या काढून घ्या.प्लॅस्टिक बरणी किंवा कोणत्याही धातूच्या धातूच्या भांड्यामध्ये काठोकाठ पाणी भरून घ्या. सोललेल्या नारळाचे डोळे वरच्या बाजूस हवेच्या संपर्कात राहतील अश्याप्रकारे अर्धवट नारळ बरणीमधील पाण्यात बुडवून ठेवा. दर सात- आठ दिवसांनी भांड्यामधील पाणी बदलतं ठेवा.साधारणतः दीड-दोन महिन्यांनी नारळाच्या वरचा भाग अंकुरित झालेला आढळून येईल.विषयाला बगल देत पुढे ते म्हणाले कि,सुख,समाधान आणि मानसिक स्थैर्य प्राप्ती करीता पिढ्यानपिढ्या देवी-देवत्याच्या चरणी नारळ अर्पण करण्याची प्रथा आहे.नारळ अर्पित करून खरोखर जर मानसिक स्थैर्य लाभत असेल तर तुम्ही स्वतः तयार केलेल्या नारळाच्या रोपापासून निर्माण होणारी हजारो नारळं जेव्हा देवांच्या चरणी अर्पण केल्या जातील तेव्हा धार्मिकते सोबतच पर्यावरण संतूलनामध्ये सुध्दा तुमचा सिंहाचा वाटा राहील ह्यात तिळमात्र शंका नाही. चला तर मग!निसर्ग ऋणातून मुक्त व ईश्वराशी समर्पित होण्याच्या उद्देश्याने येत्या जूलै महिन्यामध्ये देशी वृक्ष लागवड करू या!कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिमा मुलंगे तर आभार प्रदर्शन ओमश्री मुलंगे ह्यांनी मानले.

# सणसरमध्ये कृषीकन्यांचे आगमन शेतकऱ्यांना देणार आधुनिक शेतीचे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी अंतर्गत ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित बारामती येथील कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांचा गट कृषी व्यवसाय व्यवस्थापन कार्यानुभव (RAWE) अभ्यास दौऱ्यानिमित्त सणसर येथे दाखल झाला आहे. कृषीदूत म्हणून गावात आलेल्या विद्यार्थिनींनी शेतकरी बांधवांना आधुनिक शेती,कृषीपूरक उद्योग आणि शाश्वत कृषी व्यवस्थापना विषयी माहिती देण्यास सुरुवात केली आहे.विद्यार्थी गटाचे स्वागत सणसरचे सरपंच यशवंत नरुटे पाटील, ग्रामविकास अधिकारी सचिन पवार,कृषी सहाय्यक मार्तंड देवडे, सोसायटी संचालक पिंटू गुप्ते तसेच सामाजिक कार्यकर्ते ठेकेदार दिपक माने,युवा नेते अक्षय निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या अभ्यास उपक्रमात विद्यार्थिनी अंजली वसावे, सिद्धी देवरे, प्रतीक्षा दळवी, मधुरा सिंगारे, वैष्णवी थिटे आणि साक्षी इंगळे या सहभागी असून त्या पुढील सात आठवडे सणसर येथे मुक्कामी राहणार आहेत.या कालावधीत त्या प्रत्यक्ष शेतबांधावर जाऊन विविध शेती पद्धतींचा अभ्यास करणार



असून शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेणार आहेत.यासाठी सणसर ग्रामपंचायतमधील कर्मचारी लिपिक प्रविण शिंदे योगेश शेलार विनोद भाग्यवंत जगदीश चितारे सचिन गायकवाड यांनी सुद्धा मोलाची मदत करत आहेत.

याशिवाय दूध व्यवसाय, डेअरी उद्योग,पोल्ट्री फार्म, फळ प्रक्रिया उद्योग तसेच इतर कृषीपूरक व्यवसायांना भेटी देऊन त्याविषयी माहिती संकलित करण्यात येणार आहे.विद्यार्थिनींकडून शेतकऱ्यांसाठी विविध कृषीविषयक मार्गदर्शन शिबिरे,प्रात्यक्षिके, जनजागृती कार्यक्रम तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत.या कार्यानुभव उपक्रमासाठी संस्थेचे चेअरमन राजेंद्र पवार,मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.डॉ.निलेश नलावडे,प्राचार्या प्रा.जया तिवारी,कार्यक्रम समन्वयक प्रा.निळकंठ जंजिरे,कार्यक्रम अधिकारी डॉ.मयूर पिसाळ डॉ.पल्लवी कोळेकर आणि प्रा.शिवानी कोकरे-देसाई यांचे मार्गदर्शन लाभत आहे.ग्रामीण भागातील शेती,कृषी व्यवसाय आणि शेतकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन त्यावर उपाययोजना सुचविण्याच्या उद्देशाने हा कार्यानुभव उपक्रम राबविण्यात येत असून यामुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळण्याबरोबरच शेतकरी आणि कृषी क्षेत्रालाही त्याचा नक्कीच लाभ होणार आहे.

# अपघात होण्यापूर्वी जागे व्हा! खोपटे ग्रामस्थांचा प्रशासनाला इशारा"

**दैनिक युवक आधार**

**उरण रायगड प्रतिनिधी रणिता ठाकूर** : उरण तालुक्यातील खोपटे-कोप्रोली या नव्याने काँक्रेटीकरण करण्यात आलेल्या मुख्य रस्त्यावर वाहनांचा वाढता वेग नागरिकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अपघातांचे प्रमाण रोखण्यासाठी या मार्गावर तातडीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर) उभारावेत, अशी ठाम मागणी ग्रामस्थ मंडळ खोपटे यांच्या वतीने २ जून २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) व तहसील प्रशासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. उरण-खोपटा हा परिसरातील अत्यंत महत्त्वाचा व वर्दळीचा मार्ग मानला जातो. रस्त्यालगत अनेक औद्योगिक कंपन्या असल्याने जड वाहनांची सतत ये-जा सुरू असते. नुकतेच रस्त्याचे काँक्रिटीकरण पूर्ण झाल्यानंतर वाहनचालकांचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला असून त्यामुळे ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे याच मार्गावरून दररोज शेकडो शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्ण प्रवास करत असतात. रस्त्यावर गतिरोधक नसल्याने यापूर्वी किरकोळ अपघात घडले असून भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.









ग्रामस्थ मंडळाने प्रशासनाला सादर केलेल्या निवेदनात कारवान गोडाऊन जवळ,धसाखोशी /द.पी. पाडा बस स्टॅन्ड, म्हात्रेपाडा बस स्टॅन्ड,आणिविरगो बस स्टॅन्ड. या ठिकाणी तातडीने गतिरोधक व वाहतूक सूचना फलक उभारण्याची मागणी केली आहे.यावेळी ग्रामस्थ मंडळ खोपटेचे अध्यक्ष श्री. संतोष पाटील, सचिव श्री. कुमार ठाकूर, धसाखोशी अध्यक्ष श्री. कमलाकर म्हात्रे तसेच ग्रामस्थ मंडळाचे सल्लागार श्री. कल्पेश ठाकूर (गुरुजी) उपस्थित होते."रस्त्यांचा विकास स्वागतार्ह आहे; मात्र नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे अधिक महत्त्वाचे आहे. एखादा निष्पाप जीव गमावण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी," अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.ग्रामस्थांच्या या मागणीची दखल घेत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा भविष्यात होणाऱ्या संभाव्य अपघातांना संबंधित यंत्रणाच जबाबदार राहील, असा इशाराही स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाच्या उमेश काष्टे याची भारतीय सैन्यात निवड; प्राचार्यांच्या हस्ते सत्कार

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना (अशोक ठोके)** : परतूर येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचा बी. कॉम. तृतीय वर्षाचा विद्यार्थी उमेश काष्टे याची भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयात मंगळवारी विशेष सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. प्राचार्य डॉ. भारत खंदारे व प्राध्यापिका डॉ. रेणुका भावसार यांच्या हस्ते उमेश काष्टे याचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना प्राचार्य खंदारे म्हणाले, “उमेशने कठोर



मेहनत व जिद्दीच्या बळावर हे यश मिळवले असून तो ग्रामीण भागातील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान आहे. प्राध्यापक आर. एस. गायकवाड यांनी उमेशला सैन्य भरतीसाठी मार्गदर्शन व सरावासाठी अथक परिश्रम दिले.त्यांच्या मार्गदर्शनामुळेच उमेशचे स्वप्न साकार झाल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. महाविद्यालयातील इतर प्राध्यापकवृंद व कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी उमेशचे अभिनंदन करून पुढील लष्करी सेवेसाठी व उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. उमेशच्या निवडीमुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परतूरात उपवर्गीकरणविरोधात आंबेडकरी समाजाचा एल्गार

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके)** : परतूर येथे अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाविरोधात आंबेडकरी समाजाने मोठा मोर्चा काढून मुख्यमंत्री यांना निवेदन दिले. निवेदनाचा मुख्य गाभा "संविधानिक एकात्मता आणि सामाजिक न्यायाचे संरक्षण" हा आहे.

निवेदनातील ठळक आक्षेप उपवर्गीकरणाला विरोध हा आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कलम 341 अंतर्गत अनुसूचित जातींना दिलेली एकसंघ घटनात्मक ओळख उपवर्गीकरणामुळे धोक्यात येईल, यामुळे जाती-जातीत संघर्ष वाढून सामाजिक ऐक्य कमकुवत होईल. उपवर्गीकरणाऐवजी सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपण दूर करण्यासाठी



सरकारने ठोस धोरण राबवावे.

**प्रमुख मागण्या**

1. उपवर्गीकरण रद्द करा - प्रक्रिया तात्काळ थांबवावी 2. बदर आयोग अहवाल - न्या. अनंत बदर आयोगाचा अहवाल सार्वजनिक करावा 3. जातीनिहाय जनगणना - देश व राज्यात करावी 4. आरक्षणात वाढ - लोकसंख्येनुसार अनुसूचित जातींच्या आरक्षणात वाढ करावी 5. अनुशेष भरा - शासकीय-निमशासकीय सेवांमधील SC-ST अनुशेष तात्काळ भरावा 6. आरक्षण कायदा - अंमलबजावणी न करणाऱ्यांवर अॅट्रॉसिटी अंतर्गत कारवाईचा कायदा करावा 7. मातंग समाज आयोग - लहुजी साळवे आयोगाच्या शिफारसी उपवर्गीकरण वगळून लागू करा 8. व्यापक चर्चा करा - कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सर्व घटकांशी चर्चा, सामाजिक अभ्यास व्हावा 9. विभाजन नको - SC समाजात मतभेद निर्माण करणारे धोरण आणू नये 10. कल्याणकारी योजना - आरक्षणात विभागणी न करता स्वतंत्र उपाययोजना राबवा भूमिका स्पष्ट

"आमचा संघर्ष कोणत्याही समाजाविरोधात नसून संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी आहे. सामाजिक न्याय, बंधुता आणि समतेच्या मूल्यांनुसार शासनाने निर्णय घ्यावा. अन्यथा राज्यभर तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन उभारले जाईल."बाबासाहेबांच्या "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" या संदेशाने प्रेरित होऊन हा लढा संविधान बचावासाठी उभारल्याचे आंबेडकरी विचार मंच परतूरच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.